सत्यमेव जयते
शिक्षा मंत्रालय
भारत सरकार

PM SHRI
Pradhan Mantri ScHools for Rising India
Creating holistic and well-rounded individuals equipped with key 21st Century skills



# पंच-प्रण

## PM SHRI शाळांच्या मुख्याध्यापकांसाठी मार्गदर्शक पुस्तिका




**अमृत काळातील पंच प्रण (पाच प्रतिज्ञा)**

पहिली प्रतिज्ञा – **विकसित भारताचे ध्येय**

दुसरी प्रतिज्ञा – **वसाहतवादी मानसिकतेचे संपूर्ण उच्चाटन**

तिसरी प्रतिज्ञा – **आपल्या समृद्ध वारशाचा अभिमान**

चौथी प्रतिज्ञा – **एकता**

पाचवी प्रतिज्ञा – **नागरिकांमध्ये कर्तव्यपालनाचे भान**

**द्वारा अनुवादित**

**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.**

# संदेश

सत्यमेव जयते
शिक्षा मंत्रालय,
भारत सरकार



प्रिय मुख्याध्यापक,

मा. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचे नवभारताचे स्वप्न साकार करण्यासाठीच्या प्रवासाचा आरंभ करत असताना शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. 'पंच प्रण' ही केवळ मार्गदर्शक तत्त्वे नाहीत, तर विकसित, सर्वसमावेशक आणि संस्कृतीचा अभिमान वाटणारे असे राष्ट्र निर्माण करण्याच्या दृष्टीने घातलेला पाया आहे.

ही मार्गदर्शक पुस्तिका, 'पंच प्रण' साठीच्या आमच्या वचनबद्धतेचा दाखला असून शाळांमध्ये ही मूल्ये विकसित करण्यासाठी तयार केलेला विश्वासार्ह आराखडा आहे. या तत्त्वांचा अंगीकार करून आम्ही शैक्षणिक उत्कृष्टतेसाठी वचनबद्ध व कटिबद्ध आहोत. आपल्या राष्ट्राची ओळख निर्माण करणाऱ्या आपल्या नैतिक आणि सांस्कृतिक मूल्यांप्रति आम्ही समर्पित आहोत.

'पंच प्रण' ही मार्गदर्शक पुस्तिका राज्यातील मुख्याध्यापक आणि शिक्षकांना सक्षम करण्यासाठी तयार केलेले एक साधन आहे. ज्यायोगे आपल्या भावी पिढ्यांच्या मनाचे आणि हृदयाचे संवर्धन करेल. प्रत्येक कृती, प्रकल्प आराखडा हा आमच्या विद्यार्थ्यांमध्ये जबाबदारीची भावना, आपल्या वारशाचा अभिमान, एकता व सर्वसमावेशकतेची जाण निर्माण करण्याची संधी आहे. या प्रयत्नांमध्ये तुम्ही तुमच्या शाळेचे नेतृत्व करत असताना राष्ट्रीय स्तरावरील अत्यंत महत्त्वपूर्ण अभियानामध्ये जे योगदान देत आहात, त्याचा अभिमान बाळगा. आपल्या शिक्षणव्यवस्थेतून प्रत्येक विद्यार्थी एक स्वाभिमानी, सक्षम आणि भारताचा कर्तव्यदक्ष नागरिक बनेल याची ग्वाही देण्यासाठी आपण एकत्र काम करू या.

**धर्मेंद्र प्रधान**
शिक्षणमंत्री

# संदेश

सत्यमेव जयते
शिक्षा मंत्रालय,
भारत सरकार



प्रिय मुख्याध्यापक,

अनंत आकांक्षा बाळगून आपले राष्ट्र एका ऐतिहासिक, निर्णायक क्षणावर उभे आहे. आमचे देशवासी नवभारताच्या दृष्टीशी जोडले गेले आहेत. मा. पंतप्रधानांनी अधोरेखित केलेल्या 'पंच प्रण' प्रेरित भविष्याकडे वाटचाल करण्यासाठी उद्बोधक ठरेल. ही पुस्तिका केवळ मार्गदर्शक तत्त्वांचा संग्रह नसून, ती आपल्या अपेक्षांना आपल्या शाळांद्वारे प्रत्यक्षात साकार करावयाचे शक्तिशाली साधन आहे. या पुस्तिकेमध्ये नमूद केलेले तपशीलवार उपक्रम आणि प्रकल्पांची अंमलबजावणी करून तुम्ही अशी पिढी घडविण्यात महत्त्वाचा सहभाग देत आहात. जी पिढी आपल्या वारशाचा अभिमान बाळगेल, एकतेसाठी वचनबद्ध असेल आणि आपल्या देशाला एका अभूतपूर्व उंचीवर नेण्यासाठी नेतृत्व करेल.

तुम्ही तुमच्या शाळांमध्ये हे 'पंच प्रण' जागवताना तुमच्या कुमारवयीन विद्यार्थ्यांच्या मनावर आणि हृदयावर किती खोल परिणाम करणार आहात, यासाठी मी तुम्हास प्रोत्साहित करीत आहे. स्वावलंबन, सांस्कृतिक अभिमान आणि नागरी जबाबदारी ही केवळ तत्त्वे किंवा आदर्श नव्हेत, ते एका मजबूत आणि देदीप्यमान समाजाच्या पायाचा भक्कम चिरा आहे. या मूल्यांच्या विकासाप्रति तुमचे समर्पण हे सुनिश्चित करेल की, आपले विद्यार्थी केवळ शैक्षणिकदृष्ट्या उत्कृष्ट बनणार नसून ते राष्ट्राच्या प्रगतीत योगदान देण्यास तयार असलेले नागरिकही होतील. आपण एकत्र येऊन नवभारताचे स्वप्न साकार करू शकतो आणि आपण ते करूच!

**जयंत चौधरी**
शिक्षण राज्यमंत्री

# संदेश

सत्यमेव जयते
शिक्षा मंत्रालय,
भारत सरकार



प्रिय मुख्याध्यापक,

'पंच प्रण' मार्गदर्शक पुस्तिका आपल्या शैक्षणिक ध्येयाच्या दिशेने एकत्रित उचललेले मोलाचे पाऊल आहे. आपणास अशी एक शैक्षणिक प्रणाली निर्माण करायची आहे, ज्यायोगे विद्यार्थ्यांना केवळ ज्ञानच नव्हे, तर त्यांना आयुष्याला मार्गदर्शक ठरणाऱ्या मूल्यांचा आणि तत्त्वांचा विकास घडवायचा आहे. ही मार्गदर्शक पुस्तिका, आपल्या विद्यार्थ्यांच्या दैनंदिन अनुभवांमध्ये मूल्ये अंतर्भूत करण्याचा स्पष्ट आणि कृतिशील मार्ग दर्शवते. याद्वारे आपण निश्चितपणे राष्ट्रीय विकास कार्यामध्ये महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकू.

या पुस्तिकेत वर्णन केलेल्या कृतींद्वारे तुम्ही सक्रियपणे आपल्या राष्ट्राचे भविष्य घडवत आहात. प्रत्येक कृती प्रकल्प अशा तऱ्हेने तयार केला आहे की, त्यांत आपल्या देशाच्या अद्वितीय सांस्कृतिक मूल्यांचे प्रतिबिंब उमटले आहे. यातून विद्यार्थ्यांना उत्तम भारत घडविण्यातील त्यांची भूमिका लक्षात येईल. यामध्ये तुमचे नेतृत्व अत्यंत मोलाचे आहे. या मूल्यांची जपणूक आणि वृद्धीला पोषक वातावरण तयार करून तुम्ही केवळ एक शिक्षित पिढी घडवणार नसून, अशी पिढी निर्माण करणार आहात. जी आपल्या देशाला महान बनविणाऱ्या मूल्यांचे पालन आणि जतन करण्यासाठी कटिबद्ध असेल. मी तुम्हांला अशा संधीचा स्वीकार करण्याची विनंती करतो की; ज्यायोगे तुम्ही आपल्या विद्यार्थ्यांच्या आणि देशाच्या विकासावर एक शाश्वत अशी छाप उमटवून, दीर्घ काळ परिणाम करू शकाल.

**संजय कुमार**
सचिव
शालेय शिक्षण आणि साक्षरता विभाग,
शिक्षण मंत्रालय.

# संदेश

सत्यमेव जयते
शिक्षा मंत्रालय,
भारत सरकार



प्रिय मुख्याध्यापक,

'पंच प्रण' मार्गदर्शक पुस्तिका ही आपले मा. पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या विचारांना कृती प्रकल्पामध्ये रूपांतरित करण्यासाठी, प्रामुख्याने PM SHRI शाळांच्या मुख्याध्यापकांसाठी तयार केलेली सर्वसमावेशक मार्गदर्शक पुस्तिका आहे. नवभारताचे स्वप्न साकार करण्याच्या दृष्टीने आणि आपल्या शिक्षण पद्धतीमध्ये ही तत्त्वे सहजपणे रुजवण्यासाठी ही पुस्तिका एक महत्त्वाचे संसाधन आहे.

या पुस्तिकेमध्ये या 'पंच प्रण' यांचा बारकाईने अंतर्भाव केलेला आहे.

- **विकसित भारताचे ध्येय**
- **वसाहतवादी मानसिकतेचे संपूर्ण उच्चाटन**
- **आपल्या समृद्ध वारशाचा अभिमान**
- **एकता**
- **नागरिकांमध्ये कर्तव्यपालनाचे भान**

या मार्गदर्शक पुस्तिकेचा प्रत्येक भाग, संपूर्ण शैक्षणिक वर्षात कृती प्रकल्पांची अंमलबजावणी कशा पद्धतीने करायची, याची तपशिलवार योजना व धोरणे स्पष्ट करतो. 'पंच प्रण' मूल्ये योग्य रीतीने विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यासाठी यातील सर्व उपक्रमांची रचना शैक्षणिक आराखड्यामध्ये समाविष्ट केलेली आहे.

आपल्या शाळांमध्ये 'पंच प्रण' प्रत्यक्षात आणण्यासाठी आपण सहकार्य करून आपल्या देशाचे उज्ज्वल भवितव्य घडविण्याच्या कार्यात सहभागी होऊया.

**विपिन कुमार**
अतिरिक्त सचिव
शालेय शिक्षण आणि साक्षरता विभाग,
शिक्षण मंत्रालय

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | ‘पंच प्रण’ | १ |
| २ | PM SHRI शाळांच्या मुख्याध्यापकांची द्रष्टेपणाची भूमिका | २ |
| ३ | कृती प्रकल्प दिनदर्शिका | ३ |
| ४ | सप्ताह १–५ कृती प्रकल्प | ६ |
| ५ | सप्ताह ६–१० कृती प्रकल्प | १६ |
| ६ | सप्ताह ११–१५ कृती प्रकल्प | २६ |
| ७ | सप्ताह १६–२० कृती प्रकल्प | ३६ |
| ८ | सप्ताह २१–२५ कृती प्रकल्प | ४६ |
| ९ | उपक्रम सादर करण्यासाठी QR Code | – |

# ‘पंच प्रण‘

१ विकसित भारताचे ध्येय

२ वसाहतवादी मानसिकतेचे संपूर्ण उच्चाटन

३ आपल्या समृद्‌ध वारशाचा अभिमान

४ एकता

५ नागरिकांमध्ये कर्तव्यपालनाचे भान

# PM SHRI शाळांच्या मुख्याध्यापकांची द्रष्टेपणाची भूमिका

- शाळेचे नेतृत्व करताना स्वतःच्या आचरणातून 'पंच प्रण' मूल्ये व्यक्त करणे.
- 'पंच प्रण' मार्गदर्शक पुस्तिकेची सर्व शिक्षकांना ओळख करून देऊन त्यानुसार कृती प्रकल्पांची आखणी करणे.
- कृती प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यासाठी शिक्षकांना प्रेरित करणे आणि त्यांच्यासोबत काम करणे.
- 'पंच प्रण' संबंधी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करून, त्यानुसार काम करण्यासाठी त्यांना प्रेरित करणे.
- शाळेच्या संदर्भात 'पंच प्रण'चे मूल्यमापन करून, आवश्यक तिथे सुधारणा करून त्याची कृती प्रकल्पांद्वारे प्रभावी अंमलबजावणी करणे.
- शिक्षकांच्या प्रयत्नांना दाद देऊन विद्यार्थ्यांच्या सहभागाचे कौतुक करणे.
- शिक्षकांना सातत्याने सहाय्य करून पाठपुरावा करणे.
- 'पंच प्रण' कृती प्रकल्पांच्या अंमलबजावणीसंदर्भात गुगल फॉर्ममध्ये नोंद करणे.

# कृती प्रकल्प दिनदर्शिका

**टीप :** दिलेली कालमर्यादा फक्त मार्गदर्शक म्हणून आहे. शाळेच्या दिनदर्शिकेनुसार त्यात बदल करता येतील.

उपक्रमांचे नियोजन काही दिवस आधी सुरू करता येऊ शकते, जेणेकरून ते सुचविलेल्या आठवड्यात लागू केले जाऊ शकते.

| सप्ताह | सुचविलेला महिना | प्रण | कृती प्रकल्प |
|---|---|---|---|
| १ | सप्टेंबर | विकसित भारताचे ध्येय | आपल्या देशाचे निर्माणकर्ते |
| २ | सप्टेंबर | वसाहतवादी मानसिकतेचे संपूर्ण उच्चाटन | स्वदेशी क्रीडा सप्ताह |
| ३ | सप्टेंबर | आपल्या समृद्ध वारशाचा अभिमान | कथालेखन महोत्सव |
| ४ | सप्टेंबर | एकता | भारतातील राज्ये या विषयावरील विद्यार्थी सभा |
| ५ | सप्टेंबर/ऑक्टोबर | नागरिकांमध्ये कर्तव्यपालनाचे भान | शासकीय संस्थांची परिचय भेट |

| सप्ताह | सुचविलेला महिना | प्रण | कृती प्रकल्प |
|---|---|---|---|
| ६ | ऑक्टोबर | विकसित भारताचे ध्येय | सुदृढ मन, बलवान राष्ट्र |
| ७ | ऑक्टोबर/नोव्हेंबर | वसाहतवादी मानसिकतेचे संपूर्ण उच्चाटन | आमचा गौरवशाली इतिहास, आमचा अभिमान! |
| ८ | नोव्हेंबर | आपल्या समृद्ध वारशाचा अभिमान | पारंपरिक भारतीय कला आणि हस्तकला कार्यशाळा |
| ९ | नोव्हेंबर | एकता | थोर राष्ट्रीय व्यक्ती |
| १० | नोव्हेंबर | नागरिकांमध्ये कर्तव्यपालनाचे भान | तरंगलहरी सौजन्याच्या |

| सप्ताह | सुचविलेला महिना | प्रण | कृती प्रकल्प |
|---|---|---|---|
| ११ | नोव्हेंबर | विकसित भारताचे ध्येय | डिजिटल साक्षरता |
| १२ | डिसेंबर | वसाहतवादी मानसिकतेचे संपूर्ण उच्चाटन | स्थानिक संस्कृतीची ओळख |
| १३ | डिसेंबर | आपल्या समृद्ध वारशाचा अभिमान | कृतिशील मूल्ये |
| १४ | डिसेंबर | एकता | माझी संस्कृती, माझा अभिमान : सांस्कृतिक प्रदर्शन |
| १५ | जानेवारी | नागरिकांमध्ये कर्तव्यपालनाचे भान | नागरी जबाबदारीविषयक कार्यशाळा |

| सप्ताह | सुचविलेला महिना | प्रण | कृती प्रकल्प |
|---|---|---|---|
| १६ | जानेवारी | विकसित भारताचे ध्येय | पोषण बाग |
| १७ | जानेवारी | वसाहतवादी मानसिकतेचे संपूर्ण उच्चाटन | भारतीय घटनात्मक मूल्यांचे आकलन |
| १८ | जानेवारी/फेब्रुवारी | आपल्या समृद्ध वारशाचा अभिमान | आधुनिक भारताच्या शिल्पकारांचा गौरव उत्सव |
| १९ | फेब्रुवारी | एकता | विविधता पुस्तिका |
| २० | फेब्रुवारी | नागरिकांमध्ये कर्तव्यपालनाचे भान | युवा संसद |

| सप्ताह | सुचविलेला महिना | प्रण | कृती प्रकल्प |
|---|---|---|---|
| २१ | फेब्रुवारी | विकसित भारताचे ध्येय | आरोग्य आणि स्वच्छता मोहीम |
| २२ | फेब्रुवारी/मार्च | वसाहतवादी मानसिकतेचे संपूर्ण उच्चाटन | स्वयंपूर्ण गाव : निबंध स्पर्धा |
| २३ | एप्रिल | आपल्या समृद्ध वारशाचा अभिमान | ऐतिहासिक वारसास्थळांना भेटी |
| २४ | एप्रिल | एकता | भाषा शिक्षणासाठी पोषक वातावरण |
| २५ | एप्रिल | नागरिकांमध्ये कर्तव्यपालनाचे भान | चला करू पुनःप्रक्रिया |

## प्रण-१ विकसित भारताचे ध्येय

### कृती प्रकल्प : आपल्या देशाचे निर्माणकर्ते

| उद्दिष्ट | साहित्य |
|---|---|
| • विद्यार्थ्यांना विविध व्यवसायांची माहिती होणे, त्यांचे राष्ट्रीय विकासातील महत्त्व समजणे आणि व्यावसायिक विकासाच्या उपलब्ध संधींची ओळख होणे. | • स्थानिक व्यावसायिकांची संपर्क माहिती घेणे.<br>• आठवडाभर चालणाऱ्या संवादाचे वेळापत्रक आणि रूपरेषा<br>• वक्त्यांना बोलण्यासाठी जागा आणि सामग्री (ध्वनिक्षेपक, प्रोजेक्टर) |

**तयारीसाठी कालावधी : ३ ते ४ दिवस**
**अंमलबजावणीसाठी कालावधी : २ दिवस**

### कार्यपद्धती

- **पहिली पायरी :** योजना कार्यान्वित करणाऱ्या कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करून अंमलबजावणीबाबत सूचना द्या.
- **दुसरी पायरी :** स्थानिक व्यावसायिकांशी संपर्क साधण्याची जबाबदारी शिक्षकांवर सोपवा आणि त्यांना योजनेचे उद्दिष्ट आणि अपेक्षा याबाबतची माहिती द्या.
- **तिसरी पायरी :** उपक्रमात सहभाग घेऊ शकणारे किमान पाच व्यावसायिक/माजी विद्यार्थी नक्की करा.
- **चौथी पायरी :** आठवडाभराच्या कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी वेळापत्रक तयार करा, वक्ते सुनिश्चित करा, उदा. आठवड्यातील पाच दिवसांमध्ये परिपाठात दररोज अर्धा तास कालावधी निश्चित करा.
- **पाचवी पायरी :** वक्त्यांबरोबर संवादाची रूपरेषा ठरवून घ्या.
- **सहावी पायरी :** विद्यार्थ्यांनी तयार केलेले स्मृतिचिन्ह/भेटवस्तू देऊन वक्त्यांचा सत्कार करा.
- **सातवी पायरी :** या उपक्रमातून विद्यार्थी काय शिकले, ते त्यांना लिहायला सांगून हा कार्यक्रम पुढे कसा न्यायचा, याबद्दल विद्यार्थ्यांची मते जाणून घ्या.

| अपेक्षित परिणाम | मूल्यमापन |
|---|---|
| • विविध व्यावसायिक क्षेत्रांविषयी विद्यार्थ्यांची वाढलेली जाण.<br>• शाळा आणि स्थानिक समुदायातील व्यावसायिकांशी निर्माण झालेले दृढ अनुबंध.<br>• सक्षम व्यवसाय वाटा आणि नागरी सहभागात विद्यार्थ्यांची वाढलेली जिज्ञासा. | • परस्परसंवादाची परिणामकारकता आणि प्रभाव यासंबंधी शिक्षक, विद्यार्थी आणि व्यावसायिकांकडून अभिप्राय गोळा करा.<br>• व्यावसायिक संवादाच्या वेळी विद्यार्थ्यांच्या सहभागाचे निरीक्षण करा.<br>• या चर्चांमधून विद्यार्थांचे वर्तन, वृत्ती आणि ज्ञानामध्ये झालेल्या बदलांचे मूल्यांकन करा. |











सप्ताह दुसरा

## प्रण–२ वसाहतवादी मानसिकतेचे संपूर्ण उच्चाटन

### कृती प्रकल्प : स्वदेशी क्रीडा सप्ताह

| उद्दिष्ट | साहित्य |
|---|---|
| • विद्यार्थ्यांच्या शारीरिक हालचालींना प्रोत्साहन देण्यासाठी स्वदेशी खेळांच्या माध्यमातून जागृती करणे व या खेळांचे फायदे | • स्वदेशी खेळांची भित्तीचित्रे<br>• निवडलेल्या देशी खेळांसाठीची नोंदवही<br>• निवडलेल्या देशी खेळांसाठी साहित्य यादी आणि उपलब्धता<br>• शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे प्रत्याभरण जमा करण्यासाठी फॉर्म. |

**तयारीसाठी कालावधी : ३ दिवस**
**अंमलबजावणीसाठी कालावधी : ३ दिवस**

### कार्यपद्धती

- **पहिली पायरी : क्रीडा सप्ताहापूर्वी :** शाळेत स्वदेशी खेळ सप्ताहाचे नियोजन करण्यासाठी कर्मचाऱ्यांची बैठक घ्या.
- **दुसरी पायरी : क्रीडा सप्ताहापूर्वी :** सकाळच्या परिपाठामध्ये 'स्वदेशी क्रीडा सप्ताहा'ची घोषणा करा.
- **तिसरी पायरी : क्रीडा सप्ताहापूर्वी :** स्वदेशी क्रीडा सप्ताह आणि त्याचे फायदे यासंबंधी पोस्टर शाळेच्या आवारात प्रदर्शित करा.
- **चौथी पायरी : क्रीडा सप्ताहापूर्वी :** विविध क्रीडाप्रकारांत भाग घेण्यासाठी विद्यार्थ्यांची नाव नोंदणी करण्यासाठी वर्ग शिक्षकांना उपस्थितीपत्रक द्या.
- **पाचवी पायरी : क्रीडा सप्ताहादरम्यान :** संबंधित शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली निवडक खेळ उपक्रम सप्ताहात राबवा.
- **सहावी पायरी : क्रीडा सप्ताहादरम्यान :** वर्गशिक्षकांना स्वदेशी खेळांची उत्पत्ती आणि फायदे यांवर चर्चा करायला सांगा.
- **सातवी पायरी : क्रीडा सप्ताहानंतर :** शिक्षकांना अभिप्रायासाठी फॉर्म देऊन या प्रकल्पामध्ये सुधारणा सुचविण्यास सांगा.
- **आठवी पायरी : क्रीडा सप्ताहानंतर :** शाळेच्या समाज माध्यमातील खात्यावर सप्ताहातील छायाचित्रे प्रदर्शित करा.

| अपेक्षित परिणाम | मूल्यमापन |
|---|---|
| • स्वदेशी खेळांबद्दल विद्यार्थ्यांमध्ये वाढलेली जागरूकता व जाणीव.<br>• विद्यार्थ्यांची वाढलेली शारीरिक तंदुरुस्ती आणि पारंपरिक खेळांचे आरोग्याला होणारे फायदे समजणे. | • गोळा केलेल्या खेळासाठीच्या नोंदवहीद्वारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करून विद्यार्थ्यांचा कोणत्या खेळ प्रकारांकडे कल आणि स्वारस्य आहे, ते तपासा.<br>• मूल्यांकन करण्यासाठी शिक्षकांच्या अभिप्राय पत्रकामधल्या माहितीचे अवलोकन करा व क्रीडा सप्ताहाची यशस्विता तपासा. विद्यार्थी सहभागाचे मूल्यांकन करताना त्यांची उपक्रमांतील व्यग्रता पातळी, सूचनांची स्पष्टता, मुख्य मूल्यांची विद्यार्थ्यांना आलेली समज व परिणाम तपासा. या अभ्यासातून सुधारणेस वाव असलेल्या गोष्टी लक्षात घ्या व पुढील उपक्रमांची परिणामकारकता वाढवा. |









**सप्ताह तिसरा**

## प्रण – ३ आपल्या समृद्ध वारशाचा अभिमान

### कृती प्रकल्प : कथालेखन महोत्सव

| उद्दिष्ट | साहित्य |
|---|---|
| • विद्यार्थ्यांना भारतीय लोककथा, पौराणिक कथा आणि इतिहास यांतून प्रेरणा घेऊन कथा लिहिण्यास प्रोत्साहित करणे. विद्यार्थ्यांच्या लेखन कौशल्यवृद्धी आणि सांस्कृतिक वारसा समजून घेण्यातील गोडी वाढवण्यावर भर देणे. | • कथासंग्रह अथवा भारतीय लोककथा, पौराणिक कथा आणि इतिहास यांवर आधारलेली सामग्री.<br>• कथालेखनासाठी मार्गदर्शक तत्त्वे आणि निवडीचे निकष.<br>• उत्कृष्ट कथा लेखकांसाठी प्रमाणपत्रे व बक्षिसे. |

**तयारीसाठी कालावधी : २ दिवस** **अंमलबजावणीसाठी कालावधी : ३ ते ४ दिवस**

### कार्यपद्धती

- **पहिली पायरी : कथालेखन सप्ताहापूर्वी :** शिक्षकांची बैठक घेऊन कार्यक्रमाची उद्दिष्टे, रूपरेषा इ. सर्व तपशील निश्चित करा.
- **दुसरी पायरी : कथालेखन सप्ताहापूर्वी :** शिक्षकांनी कार्यक्रमाचा तपशील विद्यार्थ्यांबरोबर सामायिक करण्यासाठी शिक्षकांना प्रोत्साहित करा. शिक्षकांनी भारतीय लोककथा, पौराणिक कथा आणि इतिहास यांतील मूळ कथा विद्यार्थ्यांना सांगून, कथालेखनाच्या विषय निवडीसंदर्भात त्यांना मार्गदर्शन करा.
- **तिसरी पायरी : कथालेखन सप्ताहादरम्यान :** शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रभावी कथालेखनाच्या तंत्रासंबंधी मार्गदर्शन करण्यासाठी सत्र कसे योजावे, याबद्दल मार्गदर्शन करा. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पालक, ज्येष्ठ मंडळी, भावंडे, समाजातील इतर घटक यांच्याशी चर्चा करायला सांगून प्रत्यक्ष कथालेखनासाठी मार्गदर्शन करा.
- **चौथी पायरी : कथालेखन सप्ताहादरम्यान :** कथालेखन उपक्रमासाठी वेळापत्रकामध्ये योग्य कालावधी द्या.
- **पाचवी पायरी : कथालेखन सप्ताहादरम्यान :** पूर्ण झालेल्या कथा एकत्रित करून त्यांची एक पुस्तिका तयार करा.
- **सहावी पायरी : कथालेखन सप्ताहानंतर :** कथांचे मूल्यमापन करून उत्कृष्ट कथालेखकांना प्रमाणपत्र व बक्षिसे प्रदान करा.
- **सातवी पायरी : कथालेखन सप्ताहानंतर :** विद्यार्थ्यांकडून अभिप्राय गोळा करा व शिक्षकांना त्याचे विश्लेषण करण्यास सांगा.
- **आठवी पायरी :** भविष्यात करावयाच्या सुधारणांसाठी अभिप्रायांतून मिळालेल्या सूचना समजून घ्या.

| अपेक्षित परिणाम | मूल्यमापन |
| --- | --- |
| • विद्यार्थ्यांचे सर्जनशील लेखन कौशल्य वाढवणे.<br>• सहयोगी कौशल्ये जोपासणे. विद्यार्थी आणि शिक्षक या दोघांमध्ये समुदायाची भावना जोपासणे. | • विद्यार्थ्यांच्या लेखन कौशल्यावर आधारित कथांचे विश्लेषण करा. कथेची (सुरुवात, मध्य, शेवट) हे घटक, सर्जनशीलता, सहयोग व पालक, ज्येष्ठ व्यक्ती, भावंडे आणि समाजातील इतर घटक व्यक्तींशी साधलेला संवाद.<br>• शिक्षकांनी या घटकांवर आधारित विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे मूल्यमापन करून प्रत्याभरण करा.<br>• प्राप्त प्रत्याभरणाचे विश्लेषण करून उपक्रमाचे यशस्वी पैलू आणि सुधारण्यास वाव असलेली क्षेत्रे विशद करा. |






सप्ताह चौथा

## प्रण – ४ एकता

### कृती प्रकल्प : भारतातील राज्ये या विषयावरील विद्यार्थी सभा

| उद्दिष्ट | साहित्य |
|---|---|
| • भारतातील राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश या मुख्य विषयावर शाळेच्या सभागृहात चर्चा करून विद्यार्थ्यांमध्ये एकतेची भावना निर्माण करणे. | • सामग्री : राज्य नकाशे आणि कोडी<br>• सांस्कृतिक विषयांची चित्रे<br>• राज्यांची मध्यवर्ती कल्पना असणारे कोलाज ज्यामध्ये विविध राज्यातील शेती पिके, नृत्यप्रकार, खाद्यसंस्कृती इत्यादीचे दर्शन घडेल. |

**तयारीसाठी कालावधी : १ ते २ दिवस**
**अंमलबजावणीसाठी कालावधी : १ दिवस**

### कार्यपद्धती

- **पहिली पायरी :** विविधतेत एकता या मध्यवर्ती कल्पनेभोवती शाळेत सभा घेताना विविध विषयांचा विचार करा. – उदा. भारतातील सांस्कृतिक उत्सव, देशात बोलल्या जाणाऱ्या विविध भाषा, प्रादेशिक हस्तकला, विविध राज्यांचे पारंपरिक पोशाख.
- **दुसरी पायरी :** विविधतेत एकता या मध्यवर्ती कल्पनेला अनुसरून दिनदर्शिका तयार करा.
- **तिसरी पायरी :** दिनदर्शिकेनुसार सभांचे नियोजन आणि आयोजन करा. त्यामध्ये विद्यार्थ्यांना वक्ते, सादरकर्ते, कलाकार अशा विविध भूमिका साकारण्यास सांगून त्यांचा सक्रिय सहभाग घ्या.
- **चौथी पायरी :** प्रत्येक सभेनंतर त्या मध्यवर्ती कल्पनेची चर्चा वर्गात करा. ज्यामधून विद्यार्थी काय शिकले आणि त्यांच्या रोजच्या जीवनात ते अनुभव कसे लागू होतात, याचा विचार विद्यार्थ्यांना करायला प्रोत्साहित करा.

| अपेक्षित परिणाम | मूल्यमापन |
|---|---|
| • भारतातील प्रत्येक राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांतील विविधतेची विद्यार्थ्यांना माहिती मिळेल. | • भारतातील राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश या मध्यवर्ती कल्पनेभोवती एक तरी सभा आयोजित करा.<br>• या सभेमध्ये समाविष्ट कल्पनांसंबंधी वर्गांमध्ये चर्चा आयोजित करा. |









सप्ताह पाच

## प्रण–५ नागरिकांमध्ये कर्तव्यपालनाचे भान

### कृती प्रकल्प : शासकीय संस्थांची परिचय भेट

| उद्दिष्ट | साहित्य |
|---|---|
| • स्थानिक स्वराज्य संस्थांचे कार्य, प्रभाव आणि व्यावहारिक जीवनात त्यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून देणे. | • परवानगी पत्रक, संमतिपत्र<br>• विद्यार्थ्यांनी कशाचे आणि कसे निरीक्षण करावे, त्याची सूची.<br>• सत्र तयारीसाठी चर्चा मार्गदर्शक साहित्य, प्रत्याभरण फॉर्म |

**तयारीसाठी कालावधी : ३ ते ४ दिवस**
**अंमलबजावणीसाठी कालावधी : २ दिवस**

### कार्यपद्धती

- **पहिली पायरी :** शैक्षणिक उद्दिष्ट निश्चित करून, स्थानिक स्वराज्य संस्थांना जसे – ग्रामपंचायत, नगरपालिका, निगम, जिल्हा प्रशासन कार्यालय यांना प्रत्यक्ष भेट देऊन चर्चासत्राचे नियोजन करा.
- **दुसरी पायरी :** यासाठी अधिकारी आणि पालकांची परवानगी घ्या. जर परवानगी मिळाली नाही, तर त्याला पर्याय म्हणून करायचे उपक्रम खालीलप्रमाणे : प्रामाणिकपणे कर्तव्य पार पाडणारी एखादी भूमिका सादर करणे. (उदा. सापडलेल्या वस्तू परत करणे, सामाजिक नियमांचे पालन करणे, समस्यांची तक्रार अधिकाऱ्यांकडे करणे.) प्रामाणिकपणाची प्रतिज्ञा घेणे.
- **तिसरी पायरी :** विद्यार्थ्यांना भेटीचा उद्देश सांगा.
- **चौथी पायरी :** भेटीसाठी विविध संस्थांशी समन्वय साधा.
- **पाचवी पायरी :** स्थानिक स्वराज्य संस्थांचे दौरे आयोजित करताना अधिकाऱ्यांना मार्गदर्शक म्हणून सोबत घ्या.
- **सहावी पायरी :** संस्थांच्या विविध पैलूंचे निरीक्षण करण्यासाठी विद्यार्थ्यांची नियुक्ती करा.
- **सातवी पायरी :** अशा चर्चासत्राचे आयोजन करा. विद्यार्थी त्यांची निरीक्षणे आणि अनुभव सांगू शकतील.
- **आठवी पायरी :** विद्यार्थ्यांकडून भेटीसंबंधी प्रत्याभरण फॉर्म संग्रहित करा.

| अपेक्षित परिणाम | मूल्यमापन |
| --- | --- |
| • संस्थांच्या कार्याबद्दल विद्यार्थ्यांमध्ये वाढलेली समज.<br>• केलेल्या अभ्यासाचा प्रत्यक्ष जीवनात उपयोग करण्याची वाढलेली क्षमता.<br>• चिकित्सक निरीक्षण आणि वैचारिक कौशल्य | • स्थानिक स्वराज्य संस्थांच्या भेटीचे शैक्षणिक महत्त्व याबाबत शिक्षक व विद्यार्थ्यांचा अभिप्राय संकलित करा.<br>• चर्चेदरम्यान विद्यार्थ्यांचे आकलन आणि सहभागाचे मूल्यांकन करा.<br>• भेटीच्या परिणामांची तुलना पूर्वनिर्धारित शैक्षणिक उद्दिष्टांशी करा. |













सप्ताह सहा

## प्रण–१ विकसित भारताचे ध्येय

### कृती प्रकल्प : सुदृढ मन, बलवान राष्ट्र

| उद्दिष्ट | साहित्य |
|---|---|
| • या प्रकल्पात शाळा विद्यार्थ्यांसाठी मानसिक आरोग्यावर चर्चासत्र आयोजित करणे.<br>• मानसिक आरोग्याच्या मूलभूत संकल्पनां–बद्दल विद्यार्थ्यांना सांगणे.<br>• विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य सदृढ करण्याच्या दृष्टीने चांगल्या पद्धती स्वीकारून त्यांची अंमलबजावणी करणे. | • बाह्य तज्ज्ञ वक्त्यांचा संपर्क तपशील<br>• वक्ते किंवा शिक्षकांसाठी चर्चासत्राची रूपरेषा<br>• चर्चासत्रासाठी लागणारे पूरक साहित्य<br>• मानसिक आरोग्याच्या जागृतीसाठी घ्यायची शपथ. |

**तयारीसाठी कालावधी : ३ ते ४ दिवस**
**अंमलबजावणीसाठी कालावधी : १ दिवस**

### कार्यपद्धती

- **पहिली पायरी : सत्रापूर्वी :** शिक्षकांबरोबर बैठक घेऊन हे सत्र बाहेरची तज्ज्ञ व्यक्ती घेईल की, शाळेतील शिक्षकांपैकी कोणी घेणार आहे, ते निश्चित करा.
- **दुसरी पायरी : सत्रापूर्वी :** जर बाहेरच्या तज्ज्ञ व्यक्तीला बोलावणार असाल, तर मानसशास्त्रज्ञ किंवा समुपदेशक अशांसारख्या व्यावसायिक तज्ज्ञांना आमंत्रित करा.
- **तिसरी पायरी : सत्रापूर्वी :** वक्त्याला किंवा तज्ज्ञांना या प्रकल्पाच्या उद्दिष्टांविषयी माहिती द्या व त्यानुसार तयारी करण्यास सांगा.
- **चौथी पायरी : सत्रापूर्वी :** शाळेतील शिक्षक सत्र घेणार असतील तर प्राप्त साहित्य त्यांना देऊन सत्राच्या नियोजनात मदत करा.
- **पाचवी पायरी : सत्रापूर्वी :** सत्राचा कालावधी, आवश्यक साहित्याचा पुरवठा इत्यादी बाबींचे नियोजन आणि व्यवस्थापन करा.
- **सहावी पायरी : सत्रापूर्वी :** विद्यार्थ्यांकडून येणाऱ्या प्रश्नांसाठी कालावधी राखून ठेवा.
- **सातवी पायरी : सत्रादरम्यान :** विद्यार्थ्यांना मानसिक स्वास्थाबद्दल जागरूकतेची शपथ घ्यायला सांगा.

| अपेक्षित परिणाम | मूल्यमापन |
|---|---|
| • विद्यार्थ्यांमध्ये मानसिक स्वास्थ्याबद्दल वाढलेली जागरूकता आणि आकलन.<br>• मानसिक आरोग्य हाताळणाऱ्या विविध पद्धती माहीत असणारे सक्षम विद्यार्थी.<br>• मानसिक आरोग्याला अग्रक्रम देणारे पोषक वातावरण तयार करण्यावर विशेष भर देणे. | • सत्राची परिणामकारकता आणि समर्पकता यांसंबंधी शिक्षक आणि विद्यार्थ्यांकडून अभिप्राय संकलित करा.<br>• सत्रादरम्यान आणि प्रश्नोत्तरांच्या दरम्यान विद्यार्थ्यांच्या सहभागाची देखरेख करा.<br>• मानसिक आरोग्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन आणि जागरूकता यात झालेल्या बदलाचे मूल्यमापन करण्यासाठी सर्वेक्षण किंवा चर्चासत्राचे अयोजन करा. |



Ministry of Education
Government of India

**MANODARPAN**

is here to listen
Speak up children





सप्ताह सात

## प्रण-२ वसाहतवादी मानसिकतेचे संपूर्ण उच्चाटन

### कृती प्रकल्प : आमचा गौरवशाली इतिहास, आमचा अभिमान!

| उद्दिष्ट | साहित्य |
|---|---|
| • भारताच्या ऐतिहासिक व्यक्तींनी केलेले बलिदान आणि राष्ट्रनिर्मितीत दिलेले योगदान, यासंबंधी विद्यार्थ्यांना माहिती देणे व आपल्या इतिहासाचा अभिमान आपण का बाळगावा, याबद्दल सांगणे.<br>• भारतीयांनी भारतीय जीवनमूल्ये, समृद्ध संस्कृती, आणि ज्ञानावर आधारलेल्या भारताची, एक राष्ट्र म्हणून केलेली निर्मिती याबद्दल जाणून घेणे. | • तक्ता, स्केच पेन यांसारखे लेखन साहित्य.<br>• नियोजनानुसार सत्र आयोजनाचे स्थळ, कालावधी, इ. सर्व व्यवस्था. |

**तयारीसाठी कालावधी : ३ ते ४ दिवस** **अंमलबजावणीसाठी कालावधी : १ दिवस**

### कार्यपद्धती

- **पहिली पायरी :** शिक्षकांशी चर्चा करून कोणत्या ऐतिहासिक घटनांचा या सत्रात समावेश करायचा आहे, ते निश्चित करा.
- **दुसरी पायरी :** विद्यार्थ्यांचे गटामध्ये विभाजन करून त्यांना कोणत्या ऐतिहासिक घटनेवर नाटिका करायला आवडेल, त्याची चर्चा करा.
- **तिसरी पायरी :** संवाद आणि नाटिकेसाठी लिखित तपशिलाला अंतिम स्वरूप देण्यासाठी विद्यार्थ्यांना मदत करा.
- **चौथी पायरी :** नाटिकेच्या सादरीकरणासाठी तारीख, कालावधी, स्थान निश्चित करा व आवश्यक साहित्याची जमवाजमव इत्यादी व्यवस्था करा.
- **पाचवी पायरी :** सादरीकरणाच्या वेळी विद्यार्थ्यांच्या पालकांना व समाजातील इतर व्यक्तींना आमंत्रित करा.
- **सहावी पायरी :** नियोजनाप्रमाणे नाटिकेचे सादरीकरण करताना त्यामागचा संदेश अधोरेखित करा.
- **सातवी पायरी :** नाटिकेचा अनुभव कसा होता व त्यांतून काय संदेश मिळाला, या संबंधी विद्यार्थी आणि पालकांच्या नंतर प्रतिक्रिया गोळा करा.
- **आठवी पायरी :** ऐतिहासिक घटना आणि त्यासंबंधीचे विषय यांवर वर्गात चर्चा करून संबंधित मूल्यांची उजळणी करा.

| अपेक्षित परिणाम | मूल्यमापन |
| --- | --- |
| • राष्ट्र म्हणून आपली ओळख निर्माण करणाऱ्या ऐतिहासिक घटनांवर आधारलेली छोटी नाट्कली विद्यार्थी सादर करतील. | • या उपक्रमातून पालकांना आणि विद्यार्थ्यांना मिळालेला अनुभव आणि शिकवण समजावून घेऊन त्यांचा दृष्टिकोन जाणून घ्या.<br>• ऐतिहासिक घटनांसंबंधीच्या चर्चा पाठांच्या पाठ्यनियोजनातही अंतर्भूत करा. |










## प्रण-३ आपल्या समृद्ध वारशाचा अभिमान

### कृती प्रकल्प : पारंपरिक भारतीय कला आणि हस्तकला कार्यशाळा

| उद्दिष्ट | साहित्य |
|---|---|
| • पारंपरिक भारतीय कलाप्रकारांची विद्यार्थ्यांना ओळख करून देणे.<br>• विद्यार्थ्यांमध्ये भारतीय सांस्कृतिक वारशाची ओळख व अभिमान वृद्धिंगत करणे.<br>• विद्यार्थ्यांना त्यांच्यातली कला आणि प्रतिभा ओळखून ती व्यक्त करण्यासाठी व्यासपीठ निर्माण करणे. | • रंग, ब्रश, कागद, चिकणमाती इत्यादी कला आविष्कारासाठी सामग्री.<br>• मधुबनी पेंटिंग, वारली चित्रकला, मातकाम यांसाठी संदर्भ साहित्य.<br>• पूर्ण झालेल्या कलाकृती दर्शनी फलकावर प्रदर्शित करणे.<br>• सहभागाचे प्रमाणपत्र<br>• कार्यशाळेचे वेळापत्रक व विषयपत्रिका |

**तयारीसाठी कालावधी : ३ ते ४ दिवस**
**अंमलबजावणीसाठी कालावधी : २ दिवस**

### कार्यपद्धती

- **पहिली पायरी :** कार्यशाळेमध्ये समाविष्ट करण्यासाठी पारंपरिक कलाप्रकार उदा. मधुबनी पेंटिंग, वारली चित्रकला, मातकाम इ. निश्चित करा.
- **दुसरी पायरी :** तारखा, कालावधी यांसह कार्यशाळेच्या वेळापत्रकाचे नियोजन करा.
- **तिसरी पायरी :** कला कार्यशाळेसाठी आवश्यक असलेले साहित्य खरेदी करून, त्याची गुणवत्ता प्राप्त करा.
- **चौथी पायरी :** या कार्यशाळेला योग्य पार्श्वभूमी आणि संदर्भ प्राप्त होण्यासाठी कला तज्ज्ञांचे प्रास्ताविक सत्र आयोजित करा.
- **पाचवी पायरी :** कार्यशाळा आयोजित करताना विद्यार्थ्यांच्या सहभागावर लक्ष ठेवा आणि त्यांना मार्गदर्शन करा.
- **सहावी पायरी :** विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांच्या कलाकृतींचे शाळेच्या आवारात प्रदर्शन भरवा.
- **सातवी पायरी :** कार्यशाळेच्या प्रभावाचे मूल्यांकन करण्यासाठी अभिप्राय प्रपत्र आणि निरीक्षणाचा वापर करा.
- **आठवी पायरी :** पारंपरिक कलांमध्ये विद्यार्थ्यांचा रस कायम राहावा म्हणून कला प्रदर्शने किंवा सुधारित कार्यशाळांसारख्या उपक्रमांचा पाठपुरावा करावा.

| अपेक्षित परिणाम | मूल्यमापन |
|---|---|
| • विद्यार्थ्यांमध्ये भारतातील पारंपरिक कलांविषयी समज आणि गोडी निर्माण होईल.<br>• विद्यार्थ्यांना पारंपरिक कलाकृती तयार करण्याचा व्यावहारिक अनुभव मिळेल.<br>• भारताच्या वारशाचा अभिमान आणि आदर वृद्धिंगत होईल. | • विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या कलाकृतींमधील गुणवत्ता आणि सर्जनशीलता यांचे निरीक्षण करा.<br>• या शिकण्याच्या अनुभवांबद्दल विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया गोळा करा. विद्यार्थी या कार्यशाळेत काय शिकले, त्यांना कार्यशाळेबद्दल काय वाटले, याबाबत ते त्यांच्या प्रतिक्रिया देतील, अशा सत्राचे आयोजन करा. |










सप्ताह नऊ

## प्रण-४ एकता

### कृती प्रकल्प : थोर राष्ट्रीय व्यक्ती

| उद्दिष्ट | साहित्य |
|---|---|
| • विद्यार्थ्यांचे गट पाडून त्या गटांनी निवडलेल्या राज्यामधील एखाद्या ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाच्या व्यक्ती संबंधांतील घटनेबद्दल, त्यांत प्रतिबिंबित होणारे शौर्य, गुण यांवर आधारित कथा लिहितील. यांतून विद्यार्थी राष्ट्र निर्माण कार्यात त्या व्यक्तीने केलेला कठोर संघर्ष आणि घेतलेल्या परिश्रमाबद्दल माहिती समजून घेतील. | • विद्यार्थ्यांनी कथाकथनाच्या दृष्टीने करावयाच्या संशोधनासाठी आवश्यक माहिती व कागदपत्रे<br>• कथालेखनासाठी मार्गदर्शक तत्त्वे.<br>• अभिप्राय प्रपत्र/फॉर्म |

**तयारीसाठी कालावधी : ४ ते ५ दिवस** **अंमलबजावणीसाठी कालावधी : १ दिवस**

### कार्यपद्धती

- **पहिली पायरी :** शिक्षकांना प्रकल्पाची ओळख करून मार्गदर्शन करा.
- **दुसरी पायरी :** वर्गातील विद्यार्थी संख्येवर आधारित गट तयार करून प्रत्येक गटाला एक राज्य निश्चित करा.
- **तिसरी पायरी :** प्रत्येक गटाला त्यांच्या नियुक्त राज्यामधली एखादी ऐतिहासिक घटना निवडून त्यातील प्रकाशझोतात न आलेल्या वीरांची माहिती संकलित करायला सांगा.
- **चौथी पायरी :** या गटांनी निवडलेल्या घटनेवर कथा लिहिताना शिक्षक मार्गदर्शन करतात याची खात्री करा. कथेच्या निवेदनात नायकाच्या गुणांचे आणि शौर्याचे वर्णन यायला हवे.
- **पाचवी पायरी :** गटांनी कथा सादर करताना प्रत्याभरण करण्यास शिक्षकांना प्रोत्साहित करा. विद्यार्थ्यांच्या कथेचे अंतिमीकरण करण्यासाठी मार्गदर्शन करा.
- **सहावी पायरी :** एका आठवड्यानंतर विद्यार्थी त्यांच्या कथा वर्गासमोर सादर करतील आणि शिक्षक प्रत्येक गटाला समान कालावधी मिळतो का, याची खात्री करतील.
- **सातवी पायरी :** दिवसाच्या उपक्रमांचा समारोप शिक्षकांनी एकता आणि राष्ट्राभिमान यांचा सारांश सादर करून करावा. अभिप्राय प्रपत्र भरून घेऊन शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया गोळा कराव्यात.


| अपेक्षित परिणाम | मूल्यमापन |
|---|---|
| • भारताचा इतिहास, प्रादेशिक वीरांचे त्यामधील योगदान याबद्दल विद्यार्थ्यांना सखोल माहिती मिळते.<br>• इतिहास आणि सांस्कृतिक वारसा समजून घेण्यामध्ये विद्यार्थ्यांची वाढलेली अभिरुची आणि सहभाग. | • प्रकल्प सादरीकरणाची स्पर्धा आयोजित करून, सर्व गटांना त्यांचे प्रकल्प सादर करण्यासाठी प्रोत्साहित करा.<br>• विद्यार्थी व शिक्षक प्रकल्प तयार करताना काय शिकले, याचे संकलन करा.<br>• त्यांच्या प्रतिक्रियांचे विश्लेषण करून कथाकथनाचे यशस्वी पैलू आणि सुधारण्यास वाव असलेली क्षेत्रे निश्चित करा. |











सप्ताह दहा

## प्रण–५ नागरिकांमध्ये कर्तव्यपालनाचे भान

### कृती प्रकल्प : तरंगलहरी सौजन्याच्या

| उद्दिष्ट | साहित्य |
|---|---|
| • विद्यार्थ्यांना समाजसेवेत सामील करून घेणे.<br>• वंचित समाज आणि वडीलधाऱ्या व्यक्तींप्रति समानुभूती आणि जबाबदारीची भावना वाढवणे. | • परवानगी पत्रे<br>• वाहतूक व्यवस्था<br>• वृद्धाश्रम आणि अनाथाश्रमांतील व्यक्तींसाठी छोट्या भेट वस्तू किंवा आवश्यक वस्तू.<br>• चिंतन नोंदवही |

**तयारीसाठी कालावधी : ३ ते ४ दिवस** **अंमलबजावणीसाठी कालावधी : २ दिवस**

### कार्यपद्धती

- **पहिली पायरी :** पालक आणि अधिकाऱ्यांकडून आवश्यक परवानगी मिळवा.
- **दुसरी पायरी :** निवडलेल्या वृद्धाश्रम आणि अनाथाश्रमांना भेट देण्यासाठी वाहतूक व्यवस्था निश्चित करा.

  किंवा

  स्थानिक समुदाय सेवा कार्यक्रमांची योजना करा जसे–की सार्वजनिक स्वच्छता मोहीम, देणगी गोळा करण्यासाठीची मोहीम इत्यादी.
- **तिसरी पायरी :** विद्यार्थ्यांना समुदाय सेवेचे महत्त्व विशद करून त्यांनी वृद्धाश्रम आणि अनाथाश्रमातील सदस्यांशी आदराने कसे वागावे, यासाठी त्यांना सूचना द्या.
- **चौथी पायरी :** वृद्धाश्रम आणि अनाथाश्रमातील सदस्यांची आपुलकीने चौकशी करून, त्यांच्यासोबत गायन, वाचन किंवा बैठ्या खेळांचे (कॅरम, बुद्धिबळ इ.) खेळांचे आयोजन करावे.

  किंवा

  भेट वस्तू देणे शक्य नसल्यास प्रशंसापत्र लिहिणे, सुरक्षाविषयक सूचनांचे पोस्टर तयार करणे किंवा सामाजिक कर्तव्यांवर आधारित भूमिकाभिनय असे उपक्रम आयोजित करणे.
- **पाचवी पायरी :** सद्भावना म्हणून काही छोट्या भेटवस्तू किंवा आवश्यक वस्तू सदस्यांना द्या.
- **सहावी पायरी :** आश्रमातून परत आल्यावर एक चर्चासत्र आयोजित करा; ज्यामध्ये विद्यार्थी त्यांच्या भेटीच्या अनुभवांबद्दल सांगतील. आपले मत नोंदवहीमध्ये लिहितील.

| अपेक्षित परिणाम | मूल्यमापन |
|---|---|
| • विद्यार्थ्यांमध्ये समानुभूती आणि सांघिक सामाजिक दायित्वाची भावना वृद्धिंगत होईल. दुसऱ्यांना मदत करण्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजेल. | • भेटीवर आधारित विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांच्या प्रतिक्रियांचे संकलन करा.<br>• विद्यार्थ्यांच्या सहभागाचे आणि प्रतिक्रियांचे विशिष्ट निकषांच्या आधारे मूल्यमापन करा.<br>• विद्यार्थ्यांना काय समजले, हे जाणून घेण्यासाठी सत्राचे आयोजन करा. नोंदवहीतील प्रतिक्रियांचे अवलोकन करा. |





## प्रण–१ विकसित भारताचे ध्येय

### कृती प्रकल्प : डिजिटल साक्षरता

| उद्दिष्ट | साहित्य |
| --- | --- |
| • आजच्या डिजिटल युगामध्ये विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक आणि शैक्षणिक विकासाला आवश्यक असणारे डिजिटल ज्ञान आणि कौशल्यांद्वारे सुसज्ज करणे. | • साप्ताहिक कार्यशाळांसाठी संगणकतज्ज्ञ.<br>• घरातील संगणक साक्षरता वाढवण्यासाठी संसाधनांसंबंधीची माहिती. |

**तयारीसाठी कालावधी : १ ते २ दिवस**
**अंमलबजावणीसाठी कालावधी : १ दिवस**


### कार्यपद्धती

- **पहिली पायरी : शिक्षक सभा :** डिजिटल साक्षरतेचे महत्त्व याबद्दल चर्चा करण्यासाठी शाळेतील शिक्षकांची सभा आयोजित करून त्यात प्रकल्पाची रूपरेषा निश्चित करा.
- **दुसरी पायरी : सकाळ सत्रातील सभा :** सकाळच्या सत्रातील सभा व सकाळच्या सत्रात विद्यार्थ्यांना डिजिटल साक्षरतेचे महत्त्व सांगून नवीन धोरणाची माहिती द्या.
- **तिसरी पायरी : साप्ताहिक कार्यशाळा :** विद्यार्थ्यांचे डिजिटल कौशल्य वाढविण्यासाठी डिजिटल साप्ताहिक कार्यशाळा आयोजित करून डिजिटल तज्ज्ञांना आमंत्रित करा.
- **चौथी पायरी : PM e-Vidya :** विद्यार्थी डिजिटल साक्षरतेवर PM e-Vidya पाहत आहेत, याची शिक्षकांना खात्री करायला सांगा.
- **पाचवी पायरी : परस्परसंवाद सत्र :** विद्यार्थी डिजिटल कौशल्यांचा सराव करू शकतील, अशा परस्परसंवाद सत्रांचे आयोजन करा.
- **सहावी पायरी : पालकांचा सहभाग :** घरामध्ये डिजिटल साक्षरतेचे समर्थन आणि मदत कशी करावी, या संबंधी पालकांना (WhatsApp, email, PTM द्वारे) सूचना द्या.

| अपेक्षित परिणाम | मूल्यमापन |
| --- | --- |
| • विद्यार्थ्यांना डिजिटल साक्षरतेचे महत्त्व समजेल.<br>• तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली होत असलेल्या साप्ताहिक कार्यशाळेतून विद्यार्थ्यांचे डिजिटल कौशल्य वाढेल व परस्परसंवादी सत्रातून सराव करता येईल. | • साप्ताहिक कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या शिकण्याचे निरीक्षण करा व त्याची नोंद करा. (पायाभूत आणि उत्तरचाचणी यांच्या मदतीने शिक्षणातील प्रगती तपासा) यासाठी टायपिंग, इंटरनेट ब्राउझींग, ई–मेलचा वापर, यांसारखे निकष वापरा.<br>• पालक डिजिटल साक्षरतेची मदत विद्यार्थ्यांना करतात. या मदतीचा, पालक– शिक्षक सभेच्या माध्यमातून मागोवा घ्या. |







सप्ताह बारा

## प्रण – २ वसाहतवादी मानसिकतेचे संपूर्ण उच्चाटन

### कृती प्रकल्प : स्थानिक संस्कृतीची ओळख

| उद्दिष्ट | साहित्य |
|---|---|
| • समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती आणि विद्यार्थ्यांच्या आंतरक्रियात्मक सत्रांद्वारे स्थानिक संस्कृतीविषयी अभिमान मनावर बिंबवणे. | • औपचारिक आमंत्रणे<br>• ठिकाणाची तयारी आणि वेळापत्रक यांचे साहित्य.<br>• सादरीकरणासाठी दृक्श्राव्य साधने.<br>• विद्यार्थ्यांसाठी वह्या |

**तयारीसाठी कालावधी : २ दिवस**
**अंमलबजावणीसाठी कालावधी : २ दिवस**

### कार्यपद्धती

- **पहिली पायरी : पूर्वतयारी :** आंतरक्रियात्मक सत्रासाठी उद्दिष्टे स्पष्ट करा, आराखडा तयार करणेसाठी शिक्षकसभेचे आयोजन करा.
- **दुसरी पायरी : पूर्वतयारी :** समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती (स्थानिक इतिहासकार, पारंपरिक कलाकार आणि कारागीर, लोकसंगीतकार व लोकनर्तक, अनुभवी व्यक्ती) जे स्थानिक परंपरा, इतिहास आणि चालीरीती यांवर आपली मते मांडत सल्ला देतील, अशा लोकांना प्रतिनिधी बनविण्याचे कार्य शिक्षकांना द्या.
- **तिसरी पायरी : पूर्वतयारी :** निवडलेल्या सदस्यांना उपक्रमाची उद्दिष्टे आणि त्यांच्या भूमिका स्पष्ट करणारे औपचारिक निमंत्रण पाठवा.
- **चौथी पायरी : प्रक्रियेदरम्यान :** सत्रासाठी आवश्यक साहित्याची जुळवाजुळव करा.
- **पाचवी पायरी : प्रक्रियेदरम्यान :** प्रत्येक सत्राची अंमलबजावणी योग्य होत आहे याची खात्री करा.
- **सहावी पायरी : प्रक्रियेनंतर :** सत्रातील महत्त्वाच्या मुद्द्यांची नोंदणी करा.
- **सातवी पायरी : प्रक्रियेनंतर :** उपक्रमाच्या प्रभावाचे मूल्यमापन आणि भविष्यातील सुधारणांसाठी सूचना मिळविणे यासाठी समाज सदस्य, शिक्षक आणि विद्यार्थी यांचे एक अभिप्राय सत्र आयोजित करा.

| अपेक्षित परिणाम | मूल्यमापन |
| --- | --- |
| • स्थानिक संस्कृतीबद्दल विद्यार्थ्यांमध्ये अभिमान आणि कृतज्ञता यांची भावना वाढेल.<br>• स्थानिक परंपरा, इतिहास आणि चालीरीती यांबद्दल विद्यार्थी ज्ञान प्राप्त करतील. | • अभिप्रायाचा छापील नमुना वापरून विद्यार्थी, शिक्षक आणि समाज सदस्य यांचेकडून अभिप्राय मिळवा.<br>• निरीक्षण तालिकेमध्ये सक्रिय सहभाग, विद्यार्थी पुरस्कृत उपक्रम, उपक्रमापूर्वी आणि नंतर लहान प्रश्नमंजूषा यांचा समावेश करा.<br>• सत्राची गुणवत्ता आणि प्रभाव यांचे मूल्यमापन करण्यासाठी नोंदविलेल्या अनुभवांचे आणि अंतर्दृष्टीचे पुन्हा अवलोकन करा.<br>• प्राप्त सूचनांच्या आधारे प्रतिक्रियांविषयी चर्चा करा, तसेच भविष्यातील सांस्कृतिक उपक्रमांचे नियोजन करा यांसाठी चिंतनात्मक सत्राचे आयोजन करा. |









सप्ताह तेरा

## प्रण – ३ आपल्या समृद्ध वारशाचा अभिमान

### कृती प्रकल्प : कृतिशील मूल्ये

| उद्दिष्ट | साहित्य |
| --- | --- |
| • विविध विषयांवरील सहशालेय स्पर्धांमध्ये गुंतवून आपल्या राष्ट्राच्या वारसाबद्दल अभिमानाची खोलवर जाणीव निर्माण करून देणे. | • मूलभूत मूल्ये आणि भारतीय सांविधानिक मूल्ये यांचा समावेश असलेल्या विविध विषयांवरील अभ्यास साहित्य.<br>• स्पर्धांसाठी आवश्यक साहित्याची तयारी. |

**तयारीसाठी कालावधी : ३ ते ४ दिवस**
**अंमलबजावणीसाठी कालावधी : २ दिवस**

### कार्यपद्धती

- **पहिली पायरी :** स्पर्धेसाठी विविध विषय (उदा. समावेशकता, समानता, समता, सांविधानिक मूल्ये, मूलभूत मूल्ये) आणि विविध प्रकारच्या स्पर्धा (उदा. वक्तृत्व, निवडा आणि बोला, वादविवाद) यांचे नियोजन करा.
- **दुसरी पायरी :** तयारी करण्यासाठी विद्यार्थ्यांना (वर्गातील पाठ, वाचनालयातील काही गोष्टी, इ.) अभ्यास साहित्य उपलब्ध करून द्या.
- **तिसरी पायरी :** अधिक समन्वयासाठी शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या मदतीने आवश्यक साहित्याची रचना करा.
- **चौथी पायरी :** स्पर्धांसाठी पालक, समाज सदस्य आणि इतर तज्ज्ञ यांना आमंत्रित करा.
- **पाचवी पायरी :** सर्व कृती व्यवस्थितपणे होतील याची काळजी घेत नियोजनाप्रमाणे स्पर्धा पार पाडा.
- **सहावी पायरी :** सहभागी स्पर्धक, प्रेक्षक आणि पाहुणे व्याख्याते यांचा त्यांच्या योगदानाबद्दल सत्कार आणि कौतुक करा.

| अपेक्षित परिणाम | मूल्यमापन |
|---|---|
| • न्याय्य, समावेशक आणि बहुलवादी समाज निर्माण करण्याची संकल्पना अमलात आणण्याविषयी विद्यार्थी शिकतील. | • निरीक्षण पडताळा यादीमध्ये वाचनालयातील स्रोतांचा वापर, वाद–विवादाची गुणवत्ता, सहयोगींचे सुलभीकरण, इतरांसोबत मध्यवर्ती कल्पनेला धरून सातत्यपूर्ण गुंतवणूक यांचा समावेश करा.<br>• सहभागी आणि उपस्थित यांचेकडून स्पर्धेतून प्राप्त त्यांचे निरीक्षण आणि ज्ञान याबाबत शिफारसपत्रे जमा करा. |







सप्ताह चौदा

## प्रण – ४ एकता

### कृती प्रकल्प : माझी संस्कृती, माझा अभिमान : सांस्कृतिक प्रदर्शन

| उद्दिष्ट | साहित्य |
| --- | --- |
| • आपल्या सांस्कृतिक वारश्याविषयी विद्यार्थ्यांना शिकण्यास प्रोत्साहित करणे.<br>• वैविध्यपूर्ण परंपरा साजरी करून विद्यार्थ्यांमध्ये अभिमान तसेच एकता यांची जाणीव निर्माण होण्यास उत्तेजन देणे. | • प्रदर्शनासाठी जागा (वर्गखोली, सभागृह किंवा खुले मैदान)<br>• प्रदर्शनासाठी टेबल्स आणि दर्शनी फलक<br>• प्रदर्शन करण्यास कला साहित्य (मार्कर, रंग, पोस्टर, इ.)<br>• सादरीकरणासाठी दृक्श्राव्य साधने<br>• समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती, स्थानिक प्रतिनिधी आणि पालक यांना आमंत्रण.<br>• अनुधावन प्रपत्र आणि प्रशस्तिपत्र |

**तयारीसाठी कालावधी : २ ते ३ दिवस** **अंमलबजावणीसाठी कालावधी : २ दिवस**

### कार्यपद्धती

**प्रदर्शनापूर्वी**

- **पहिली पायरी :** सांस्कृतिक प्रदर्शनाविषयी विद्यार्थ्यांना अभिमुख करणे आणि वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक प्रकार (उदा. गीत, नृत्य, कला, पाककला) सादर करण्यास सूचना द्या.
- **दुसरी पायरी :** प्रत्येक वर्गाचा गट तयार करून प्रत्येक गटाने एका संकल्पनेवर (उदा. स्थानिक भोजन, साधने) काम करावे अशा सूचना शिक्षकांना द्या.
- **तिसरी पायरी :** माहिती तसेच इतर वस्तू मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांना समाज तसेच वडीलधाऱ्या व्यक्तींची मदत घेण्यासाठी संवाद साधण्यास सांगा.
- **चौथी पायरी :** विद्यार्थ्यांच्या तयारीचे अवलोकन, संहितेत सुधारणा आणि सराव यांविषयी शिक्षकांना सूचना द्या.
- **पाचवी पायरी :** समाजातील सदस्य, स्थानिक प्रतिनिधी आणि पालक यांना कार्यक्रमात आमंत्रित करा.
- **सहावी पायरी :** अंतिम टप्प्यासाठी शिक्षक तसेच विद्यार्थी यांना साधनसामग्रीचे नियोजन व कार्यांचे वाटप करा.

**प्रदर्शनादरम्यान**

- **पहिली पायरी :** प्रत्येक गटास त्यांच्या प्रदर्शनासाठी पुरेशी जागा आहे याची खात्री करत प्रदर्शन आयोजित करा.
- **दुसरी पायरी :** विद्यार्थ्यांना त्यांचे प्रदर्शनीय साहित्य आणि त्यांचे सांस्कृतिक महत्त्व स्पष्ट करण्याच्या सूचना द्या.

- **तिसरी पायरी :** भारताची शक्ती म्हणून विविधता आणि स्थानिक नवीन उपक्रम यांचा संदेश नियमित देऊन सादरीकरणाचे वेळापत्रक तयार करा.

**प्रदर्शनपश्चात**

- **पहिली पायरी :** प्रदर्शनाच्या प्रभावाचे मूल्यमापन करण्यासाठी सहभागी आणि इतर विद्यार्थी यांचेकडून प्रतिक्रिया पत्र आणि अभिप्राय जमा करा.
- **दुसरी पायरी :** शिक्षक आणि विद्यार्थी यासोबत ते काय शिकले आणि त्यांचा अनुभव कसा होता याविषयी चर्चा करणेसाठी चिंतन सत्र आयोजित करा.
- **तिसरी पायरी :** सांस्कृतिक वारशातील आवड टिकून राहण्यासाठी सांस्कृतिक मंडळ किंवा नियमित सांस्कृतिक दिवस यांसारख्या कृतींचे नियोजन करा.

| अपेक्षित परिणाम | मूल्यमापन |
|---|---|
| • विद्यार्थ्यांमध्ये आपल्या आणि इतरांच्या सांस्कृतिक वारशाबद्दल खोलवर जाणीव आणि कौतुक विकसित होईल.<br>• विविध परांपरा साजरी करत त्यांच्यात अभिमान आणि एकता यांची जाणीव वाढीस लागण्यासाठी प्रेरणा मिळेल. | • प्रदर्शनाबाबत विद्यार्थ्यांची आणि अभ्यागतांची मते जाणून घेण्यासाठी अभिप्राय प्रपत्राचा उपयोग करा.<br>• प्रदर्शनादरम्यान विद्यार्थ्यांचा सहभाग आणि प्रतिबद्धता यांचे निरीक्षण करा.<br>• प्रदर्शनातून विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे झालेले अध्ययन आणि प्रदर्शनाचा एकूणच प्रभाव याचे मूल्यांकन करण्यासाठी विद्यार्थी व शिक्षकांसोबत पाठपुरावात्मक चर्चासत्र घ्या. |










**सप्ताह पंधरा**

## प्रण – ५ नागरिकांमध्ये कर्तव्यपालनाचे भान

### कृती प्रकल्प : नागरी जबाबदारीविषयक कार्यशाळा

| उद्दिष्ट | साहित्य |
|---|---|
| • विद्यार्थ्यांना त्यांची नागरी कर्तव्ये आणि नैतिक वर्तनाविषयी जागृत करणे.<br>• दैनंदिन जीवनात प्रामाणिकपणा आणि अखंडता यांचे महत्त्व रुजविणे. | • सादरीकरण साहित्य (प्रॉजेक्टर, लॅपटॉप)<br>• भूमिका पालनासाठी पूरक साहित्य<br>• नागरी कर्तव्ये आणि नैतिकता याबाबतची छापील पत्रके<br>• प्रत्याभरण प्रपत्र<br>• कार्यशाळेचे वेळापत्रक व विषय पत्रिका |

**तयारीसाठी कालावधी : २ दिवस**
**अंमलबजावणीसाठी कालावधी : २ दिवस**

### कार्यपद्धती

- **पहिली पायरी :** नागरी जबाबदारी कार्यशाळेचे वेळापत्रक ज्यात दिनांक, वेळ आणि कालावधी असेल अशा वेळापत्रकाचे नियोजन करा.
- **दुसरी पायरी :** कार्यशाळेसाठी नागरी कर्तव्ये, नैतिकता आणि प्रामाणिकपणा यावर लक्ष केंद्रित करत महत्त्वाचे मुद्दे आणि वक्ते निवडा. उदा. प्राथमिक आरोग्य सेवा याविषयी जागरूकता सत्र, इतरांना मदतीचे महत्त्व, आपले पर्यावरण स्वच्छ ठेवणे, प्रामाणिक आणि विश्वासू असणे, इतरांना आदर देणे, चांगले मित्र बनणे, नियमांचे पालन करत चांगला खेळ खेळणे.
- **तिसरी पायरी :** कार्यशाळेसाठी साहित्य आणि संसाधने तयार करा, जसे सादरीकरण, पत्रके आणि भूमिका पालनासाठी प्रसंग.
- **चौथी पायरी :** विद्यार्थ्यांना नागरी जबाबदारी विषयी गटचर्चेमध्ये गुंतवून ठेवण्यासाठी कार्यशाळा आयोजित करा.
- **पाचवी पायरी :** नागरी जबाबदारीची प्रत्यक्ष जीवनात अंमलबजावणी करण्यासाठी भूमिकापालन, रूपरेखा, प्रसंग आणि चर्चा आयोजित करा.
- **सहावी पायरी :** प्रत्याभरण प्रपत्र आणि निरीक्षणाचा वापर करत कार्यशाळेच्या प्रभावाचे मूल्यमापन करा.
- **सातवी पायरी :** नागरी जबाबदारीच्या संकल्पनेचे दृढीकरण करण्यासाठी सामाजिक सेवा प्रकल्पासारख्या पाठपुरावा करणाऱ्या कृतींचे नियोजन करा.

| अपेक्षित परिणाम | मूल्यमापन |
| --- | --- |
| • विद्यार्थ्यांना आपल्या नागरी जबाबदाऱ्या स्पष्टपणे समजतील.<br>• विविध परिस्थितीत नैतिक वर्तणुकीची वाढती जाणीव असेल. | • कार्यशाळेबाबत विद्यार्थ्यांचे मत जाणून घेण्यासाठी प्रत्याभरण प्रपत्राचा वापर करा.<br>• छोट्या प्रश्नमंजूषेनंतर लगेच भूमिकापालन प्रसंगादरम्यान विद्यार्थ्यांचा सहभाग व प्रतिबद्धता यांचे निरीक्षण करा.<br>• मूळ संकल्पनांच्या धारणांचे मूल्यमापन करण्यासाठी पाठपुरावा चर्चेचे आयोजन करा. |







सप्ताह सोळा

## प्रण – १ विकसित भारताचे ध्येय

### कृती प्रकल्प : पोषण बाग

| उद्दिष्ट | साहित्य |
|---|---|
| • टिकाऊ शालेय परसबाग निर्माण करणे आणि पर्यावरणीय जाणिवा व आरोग्यदायी आहाराच्या सवयींना प्रोत्साहन देणे. | • माहिती पुस्तिका<br>• परसबाग उभारण्यासाठी मार्गदर्शक सूचना.<br>• बागकामाचे साहित्य (कुदळ, पाण्याची झारी, फावडे)<br>• अनुधावन प्रपत्र |

**तयारीसाठी कालावधी : ५ दिवस**
**अंमलबजावणीसाठी कालावधी : १ दिवस**

### कार्यपद्धती

- **पहिली पायरी :** ईको–क्लब सदस्य आणि जीवशास्त्र/विज्ञान शिक्षक यांची शाश्वत बाग निर्माण करण्याविषयी एक सभा आयोजित करा.
- **दुसरी पायरी :** ईको–क्लब सदस्य, स्थानिक शेतकरी आणि माळी यांची शाळेच्या परसबागेत सहज जोपासणारी रोपटी लावण्याविषयी सभा आयोजित करा.
- **तिसरी पायरी :** आपल्या प्रदेशाच्या हवामानास अनुकूल आणि जमिनीचा पोत याला योग्य, तसेच पोषणद्रव्ये आणि मानवी शरीराच्या आरोग्यासाठी फायदेशीर अशा आठ योग्य रोपांचा विचार बागेसाठी करून निश्चित करा.
- **चौथी पायरी :** टिकाऊ रोपट्यांबाबत आवश्यक माहितीचे (हवामान, जमीन, पोषक आणि आरोग्य फायदे) माहितीसंग्रह राखले जाईल याची निश्चिती करा.
- **पाचवी पायरी :** टिकाऊ बागेसाठी पुढील नियोजन करत वृक्षारोपण मोहीम आयोजित करा.
- **सहावी पायरी :** टिकाऊ रोपट्यांच्या रोपणाची मोहीम साजरी करा.
- **सातवी पायरी :** या मोहिमेत विद्यार्थी आणि शिक्षकांना या संग्रहाबाबत माहिती द्यावी. कार्यक्रमाबाबत विद्यार्थी व शिक्षक यांचेकडून अभिप्राय गोळा करावा. भविष्यातील सुधारणासाठीचे महत्त्वाचे मुद्दे निश्चित करण्यास माहिती द्यावी.

| अपेक्षित परिणाम | मूल्यमापन |
|---|---|
| • विद्यार्थी विज्ञान अनुभवाने प्रभावित होऊन अनुभव प्राप्त करतात.<br>• बागकामामुळे पोषकतेची जाणीव आणि पर्यावरणाविषयी अनुभूती वाढीस लागते.<br>• दीर्घ काळ टिकणाऱ्या उपक्रमांना गटकार्याने प्रोत्साहन मिळते. | • विद्यार्थी आणि शिक्षक यांच्याकडून प्रत्याभरण प्रपत्राद्वारा प्रतिक्रिया मिळवा.<br>• निरीक्षण पडताळा सुचित हवामान व जमिनीचा पोत यानुसार रोपट्याच्या निवडीचे ज्ञान, रोपटे लावण्याची पद्धत, दीर्घ काळ टिकणारी बाग, इ. बाबी समाविष्ट करा.<br>• या मोहिमेचे यशस्वी पैलू व सुधारणेसाठी वाव यांचे प्रतिक्रिया मिळवून समीक्षण करा. |









सप्ताह सतरा

## प्रण – २ वसाहतवादी मानसिकतेचे संपूर्ण उच्चाटन

## कृती प्रकल्प : भारतीय घटनात्मक मूल्यांचे आकलन


| उद्दिष्ट | साहित्य |
|---|---|
| • मुलांमध्ये भारतीय घटनात्मक मूल्यांविषयी जाणीव निर्माण करणे. मूल्यांची समज व अंगीकार याविषयी व्यक्त होण्यासाठी मार्ग पुरविणे. | • घटनात्मक मूल्यांवर आधारित ॲनिमेटेड व्हिडिओ<br>• घटनात्मक मूल्यांवर माहिती पोस्टर्स<br>• वर्गातील कृती करण्यासाठी तक्ते आणि मार्कर<br>• नाटिका स्पर्धेसाठी वेशभूषा व इतर उपयोगी साहित्य |

**तयारीसाठी कालावधी : १ ते २ दिवस**
**अंमलबजावणीसाठी कालावधी : ३ दिवस**

### कार्यपद्धती

- **पहिली पायरी : कर्मचारी सभा :** विद्यार्थ्यांना घटनात्मक मूल्ये शिकविण्याचे महत्त्व याबाबत चर्चा करणेसाठी सभा आयोजित करा.
- **दुसरी पायरी : घटनात्मक मूल्यांची ओळख :** विद्यार्थ्यांना घटनात्मक मूल्यांची ओळख करून देण्यासाठी ॲनिमेटेड व्हिडिओ दाखवा.
- **तिसरी पायरी : माहितीदर्शक फलक :** घटनात्मक मूल्यांची माहिती असणारी पोस्टर्स शाळेभोवती लावा.
- **चौथी पायरी : प्रख्यात व्यक्ती :** सकाळच्या परिपाठामध्ये विद्यार्थी आपल्या दैनंदिन जीवनात घटनात्मक मूल्ये कशा प्रकारे राबवू शकतात यावर बोलण्यासाठी प्रख्यात व्यक्तींना आमंत्रित करा.
- **पाचवी पायरी : माहितीदर्शक तक्ते :** वर्गात विद्यार्थ्यांनी घटनात्मक मूल्ये कशा प्रकारे अंमलात आणावे याविषयी तक्ते लावा.
- **सहावी पायरी :** नाटिका स्पर्धा–घटनात्मक मूल्यांचे महत्त्व ठसविणाऱ्या प्रसंगांच्या नाटिका स्पर्धा आयोजित करा.

| अपेक्षित परिणाम | मूल्यमापन |
|---|---|
| • विद्यार्थ्यांमध्ये घटनात्मक मूल्यांविषयी जाणीव आणि समज वाढेल.<br>• घटनात्मक मूल्यांशी संबंधित चर्चा आणि कृतींमध्ये सक्रिय सहभाग.<br>• विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनात घटनात्मक मूल्यांचा अंगीकार करणाऱ्या वर्तनात वाढ. | • शिक्षक आणि विद्यार्थी यांचेकडून घटनात्मक मूल्यांची समज आणि सहभाग याविषयी प्रतिक्रिया मिळवा.<br>• माहितीदर्शक तक्ते आणि नाटिका स्पर्धा यातील विद्यार्थ्यांच्या सहभागाची गुणवत्ता आणि सर्जनशीलता याचे मूल्यमापन करा.<br>• घटनात्मक मूल्यांचा सराव करण्यासाठी विद्यार्थ्यांचे वर्तन आणि परस्परसंवाद यावर लक्ष ठेवा. |






## प्रण – ३ आपल्या समृद्ध वारशाचा अभिमान

### कृती प्रकल्प : आधुनिक भारताच्या शिल्पकारांचा गौरव उत्सव

| उद्दिष्ट | साहित्य |
|---|---|
| • भारताच्या इतिहासात महत्त्वाच्या व्यक्तींनी केलेल्या परिणामकारक कार्याविषयी विद्यार्थ्यांनी शिकावे म्हणून त्यांना प्रोत्साहित करणे.<br>• भारताच्या वारशाचा अभिमान वाढविणे. | • विद्यार्थ्यांना ऐतिहासिक व्यक्तींसारखी वेशभूषा करण्यासाठी वेश आणि इतर साहित्य<br>• संदर्भ साहित्य<br>• सादरीकरण साहित्य (प्रोजेक्टर, व्हिडिओसाठी लॅपटॉप)<br>• प्रत्याभरण प्रपत्र आणि नोंदी करण्यासाठी वह्या<br>• सहभागी विद्यार्थ्यांसाठी प्रमाणपत्रे |
| **तयारीसाठी कालावधी : २ ते ३ दिवस** | **अंमलबजावणीसाठी कालावधी : १ दिवस** |

### कार्यपद्धती

**सादरीकरणापूर्वी**

- **पहिली पायरी** : सादरीकरणाचे नियोजन, वेळेचे नियोजन करा आणि दिलेल्या कार्यासाठी विद्यार्थ्यांना गटकार्य द्या, याविषयी शिक्षकांना थोडक्यात सांगा.
- **दुसरी पायरी** : विद्यार्थी गटासाठी सूचना
  - ◈ प्रत्येक गटाला प्राचीन भारतातील महत्त्वाच्या व्यक्तीरेखा वाटून (उदा. आर्यभट्ट, चरक, तुलसीदास, इ.) द्या.
  - ◈ गट दिलेल्या व्यक्तिमत्त्वाविषयी शोध घेतील, त्यांच्या योगदानाबद्दल ५ मिनिटांचे भाषण तयार करा आणि एका सदस्याला त्या व्यक्तिमत्त्वासारखा पोशाख धारण करण्यासाठी सांगा.
- **तिसरी पायरी** : सादरीकरण तयार करण्यासाठी वाचन साहित्य किंवा व्हिडिओ पुरवीत शिक्षक विद्यार्थ्यांना सूचना द्या.
- **चौथी पायरी** : समाज सदस्य, स्थानिक प्रतिनिधी आणि पालक यांना आमंत्रित करा.
- **पाचवी पायरी** : शिक्षक आणि विद्यार्थी यांचेसाठी कार्याची विभागणी आणि आवश्यक साहित्याचा पुरवठा करा.

**सादरीकरणादरम्यान**


- **पहिली पायरी** : नियोजित वेळापत्रकानुसार सादरीकरण आयोजित करा.
- **दुसरी पायरी** : भारताच्या प्रगतीत या व्यक्तींचे असलेले महत्त्वाचे योगदान यावर भर देत विद्यार्थ्यांकडून सादरीकरण करून घ्या.
- **तिसरी पायरी** : सादरीकरणाच्या शेवटी भारतीय वारशाचा पुनरुच्चार करत सहभागी विद्यार्थी यांचे कौतुक करत बक्षीस द्या.

**सादरीकरणापश्चात**

- **पहिली पायरी** : विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया व प्रशंसापत्र आणि कार्यक्रमाविषयी चर्चा करा.
- **दुसरी पायरी** : भारतीय इतिहास आणि परंपरा यात सातत्याने आवड निर्माण करण्यासाठी मागोवा घेणाऱ्या कृती कराव्यात जसे की, इतिहास क्लब किंवा नियमित ऐतिहासिक व्यक्तिमत्त्व दिवस यांचे नियोजन करा.

| अपेक्षित परिणाम | मूल्यमापन |
|---|---|
| • विद्यार्थ्यांमध्ये भारतीय इतिहासातील महत्त्वाच्या व्यक्तींविषयी सखोल आकलन आणि कौतुकाची भावना वाढीस लागेल.<br>• विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृती व परंपरा याबाबत अभिमानाची जाणीव वाढीस लागेल. | • सादरीकरणाविषयी विद्यार्थी आणि अभ्यागत यांचे मत मिळविण्यासाठी प्रत्याभरण प्रपत्राचा वापर करा.<br>• कृतीनंतर विद्यार्थी संचलित उपक्रमात आणि सादरीकरणादरम्यान विद्यार्थ्यांचा सहभाग आणि प्रतिबद्धता यांचे निरीक्षण करा.<br>• विद्यार्थी आणि शिक्षक यांचे कार्यक्रमाचा प्रभाव व त्यातून काय शिकलो याविषयी पाठपुरावा चर्चा आयोजित करा. |





रवींद्रनाथ टागोर सावित्रीबाई फुले सरदार वल्लभभाई पटेल

सप्ताह एकोणवीस

## प्रण – ४ एकता

### कृती प्रकल्प : विविधता पुस्तिका

| उद्दिष्ट | साहित्य |
|---|---|
| • 'विविधता पुस्तिका' या शीर्षकाची पुस्तिका निर्माण करावी ज्यात त्यांच्या राज्याबद्दलच्या महत्त्वाच्या माहितीचा समावेश असेल, या प्रकल्पामुळे सांस्कृतिक समज वाढीस लागेल आणि भारतातील प्रत्येक राज्य आणि केंद्रशासित प्रदेशाच्या विविधतेबाबत विद्यार्थी शिकतील. | • निवडलेल्या राज्य/केंद्रशासित प्रदेशाबद्दल माहिती<br>• पुस्तिका तयार करण्यासाठी मार्गदर्शक सूचना<br>• प्रत्याभरण प्रपत्र |

**तयारीसाठी कालावधी : ५ दिवस**
**अंमलबजावणीसाठी कालावधी : १ दिवस**

### कार्यपद्धती

- **पहिली पायरी :** शिक्षकांना प्रकल्पाची ओळख देत मार्गदर्शन करा.
- **दुसरी पायरी :** 'विविधता पुस्तिका' या पुस्तिकेच्या कार्याबद्दल विद्यार्थ्यांना एक आठवडा आधीच सूचना द्या.
- **तिसरी पायरी :** शिक्षक विद्यार्थ्यांना राज्य किंवा केंद्रशासित प्रदेश निवडून द्या किंवा विद्यार्थी स्वतः निवडतात याची खात्री करा.
- **चौथी पायरी :** पुस्तिकेसाठी माहिती, चित्रे, रेखाटने साहित्य मिळविणे यांविषयी विद्यार्थ्यांना सूचना द्या.
- **पाचवी पायरी :** सहाध्यायी अध्ययनासाठी विद्यार्थ्यांमध्ये पुस्तिकांची अदलाबदल होईल आणि ते एकमेकांस प्रतिक्रिया देतील. याबद्दल सुलभन करा.
- **सहावी पायरी :** उपक्रमाबद्दल विद्यार्थी आणि शिक्षक यांच्याकडून प्रत्याभरण प्रपत्र जमा करा आणि भविष्यातील सुधारणांसाठी योग्य मुद्द्यांची निवड करा.

| अपेक्षित परिणाम | मूल्यमापन |
|---|---|
| • विद्यार्थ्यांमध्ये भारताची राज्ये व केंद्रशासित प्रदेश विविधतेविषयी जागरूकता निर्माण होईल.<br>• सहकार्य आणि एकता वाढीस लागण्यासाठी ते गटकार्यात सहभागी होतील. | • शिक्षक व विद्यार्थी यांचेकडून प्रत्याभरण प्रपत्र घ्या.<br>• पुस्तिकांच्या अदलाबदलीच्या कृतीच्या यशस्वितेचे पैलू आणि सुधारणेला असणाऱ्या बाबींचे प्रत्याभरणाद्वारे विश्लेषण करा. |



सप्ताह वीस

## प्रण – ५ नागरिकांमध्ये कर्तव्यपालनाचे भान

### कृती प्रकल्प : युवा संसद

| उद्दिष्ट | साहित्य |
|---|---|
| • वादविवादाची कौशल्ये विकसित करणे.<br>• भारतीय लोकशाहीच्या कार्यपद्धतीविषयी विद्यार्थ्यांना शिक्षित करणे. | • कार्यक्रमाचे नियोजन आणि तारखा ठरविण्यासाठी दिनदर्शिका<br>• लोकशाही आणि भारतीय संसद यांवर पुस्तके, लेख आणि दृक्‌श्राव्य साधने<br>• संसदेतील विविध कार्ये आणि जबाबदाऱ्या<br>• संसदेतील नियम आणि प्रक्रिया यांवरील शैक्षणिक पत्रक |

**तयारीसाठी कालावधी : ४ ते ५ दिवस** **अंमलबजावणीसाठी कालावधी : १ दिवस**

### कार्यपद्धती

- **पहिली पायरी :** शिक्षकांसोबत कार्यक्रमासाठी नियोजन समिती तयार करा व दिनांक निश्चित करा.
- **दुसरी पायरी :** लोकशाही आणि भारतीय संसद यांवर समाजशास्त्राच्या शिक्षकांना साहित्य गोळा करण्यासंबंधी मार्गदर्शन करा. शाळेसंदर्भात सत्र नियोजनाचा आराखडा तयार करा व संसदेतील विविध भूमिका निश्चित करा.
- **तिसरी पायरी :** भारतीय लोकशाहीपद्धती यांवर आधारित आवड आणि ज्ञान असलेल्या विद्यार्थ्यांची निवड करण्याबाबत शिक्षकांना सूचना द्या आणि त्यांना थोडक्यात मार्गदर्शन करा.
- **चौथी पायरी :** विद्यार्थ्यांना संसदेचे नियम आणि पद्धती यांविषयी माहिती देण्यास समाजशास्त्राच्या शिक्षकांना सांगा.
- **पाचवी पायरी :** संसदेत कोणते प्रश्न उपस्थित करायचे हे ठरवून विद्यार्थ्यांसाठी वादविवादासाठी वेळापत्रक तयार करा.
- **सहावी पायरी :** विद्यार्थ्यांसाठी सराव सत्र आयोजित करा.
- **सातवी पायरी :** विद्यार्थ्यांना व्यक्तिगत प्रतिक्रिया देण्यास शिक्षकांना सूचना द्या.
- **आठवी पायरी :** शाळेच्या समन्वयकास सर्व नियोजित गोष्टींची (स्थळ, माइक, स्पीकर, खुर्च्या आणि टेबल) व्यवस्था करण्यास सूचित करा.
- **नववी पायरी :** नियोजित तारखेस शाळेत संसद आयोजित करा.
- **दहावी पायरी :** उत्कृष्ट सादरीकरण करणारा विद्यार्थी निश्चित करा आणि प्रमाणपत्रे वितरित करा.

| अपेक्षित परिणाम | मूल्यमापन |
|---|---|
| • विद्यार्थी भारतीय संसदेच्या कार्यपद्धती आणि लोकशाही तत्त्वे यांविषयी सखोल ज्ञान प्राप्त करतील. | • विद्यार्थ्यांचा अनुभव मिळविण्यासाठी प्रत्याभरण प्रपत्र वापरा.<br>• साहित्य निर्मिती कृतीदरम्यान विद्यार्थ्यांचा सहभाग आणि प्रतिबद्धता यांचे निरीक्षण करा.<br>• संसदेचे नियम आणि प्रक्रिया यांविषयी निष्ठा, दिलेल्या भूमिकेचा प्रभावीपणा, लोकशाहीचे ज्ञान, इत्यादींचा समावेश असलेल्या पडताळा सूचीचे निरीक्षण करा. |








सप्ताह एकवीस

## प्रण – १ विकसित भारताचे ध्येय

### कृती प्रकल्प : आरोग्य आणि स्वच्छता मोहीम

| उद्दिष्ट | साहित्य |
|---|---|
| • आरोग्य आणि स्वच्छता शिक्षण मोहिमेतून केंद्रस्थानी ठेवून विद्यार्थ्यांना आवश्यक आरोग्यदायी सवयी, स्वच्छतेच्या सवयी अंगी बाणवणे व त्याविषयी शिक्षित करणे. | • स्वच्छतासंच (साबण, हँडवॉश, सॅनिटायझर, टूथब्रश इत्यादी.)<br>• शैक्षणिक साहित्य (पोस्टर्स, पत्रके, व्हिडिओ)<br>• चिंतन नोंदवही |

**तयारीसाठी कालावधी : ३ ते ४ दिवस**
**अंमलबजावणीसाठी कालावधी : २ दिवस**

### कार्यपद्धती

- **पहिली पायरी : सुरुवात :** मोहिमेची उद्दिष्टे व नियोजन यांची रूपरेषा ठरविण्यासाठी शिक्षकांसोबत एक सभा आयोजित करा.
- **दुसरी पायरी : दरम्यान :** आवश्यक स्वच्छतेच्या सवयी, जसे योग्य प्रकारे हात धुणे, स्वच्छता आणि व्यक्तिगत स्वच्छता तंत्रे यांवर शिक्षित करण्यासाठी आरोग्यक्षेत्रातील व्यावसायिकांना आमंत्रित करा.
- **तिसरी पायरी : दरम्यान :** शाळेच्या आवारात स्वच्छतासंच (साबण, हँडवॉश, सॅनिटाइजर इत्यादी.) उपलब्ध करून देणे आणि या सवयी घरीदेखील पाळल्या पाहिजेत याविषयी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करा.
- **चौथी पायरी : दरम्यान :** वर्गात नियमितपणे स्वच्छतेच्या सवयींचे दृढीकरण करण्याविषयी शिक्षकांना सुचित करा.
- **पाचवी पायरी : पश्चात :** शिक्षक आणि आरोग्यक्षेत्रातील व्यावसायिकांसोबत मोहिमेची प्रगती आणि इतर आव्हाने यांविषयी संबोधित करण्यासाठी मासिक सभा आयोजित करा.
- **सहावी पायरी : पश्चात :** विद्यार्थी व शिक्षक यांचेकडून आलेल्या प्रतिक्रिया बघून मोहिमेचा प्रभाव व निरीक्षणाचे विश्लेषण यांचे दस्तऐवज तयार करा.
- **सातवी पायरी : पश्चात :** निश्चित कालावधीनंतर (उदा. सहा महिने) विद्यार्थ्यांचे अनुभव व ज्ञान यांचे आदानप्रदान करण्यासाठी विचारविमर्श सत्र आयोजित करा आणि याची चिंतन वहीत नोंद घ्या. प्रकल्प पुढे कसा न्यावा याबद्दल त्यांची मते समजून घ्या.

| अपेक्षित परिणाम | मूल्यमापन |
| --- | --- |
| • व्यक्तिगत स्वच्छतेविषयी विद्यार्थ्यांमध्ये महत्त्वाची जाणीव निर्माण होईल आणि ते स्वच्छतेच्या सवयी आयुष्यभर अंगीकारतील. | • विद्यार्थी, शिक्षक आणि आरोग्यक्षेत्रातील व्यावसायिक यांच्याकडून प्रतिसाद मिळवा.<br>• मोहिमेचा एकंदर प्रभाव यांची चर्चा व पुनरावलोकन करण्यासाठी प्रतिसाद सत्र आयोजित करा.<br>• निरीक्षण पडताळा सूचीमध्ये वर्गातील निरीक्षणे, सत्रानंतर पालकांकडून प्रश्नमंजूषा आणि सर्वेक्षणाद्वारे पाठपुरावा, विद्यार्थी संचलित नवीन स्वच्छता मोहिमेचे आयोजन इत्यादींचा समावेश करा. |








## प्रण – २ वसाहतवादी मानसिकतेचे संपूर्ण उच्चाटन

### कृती प्रकल्प : स्वयंपूर्ण गाव : निबंध स्पर्धा

| उद्दिष्ट | साहित्य |
|---|---|
| • गावांच्या आत्मनिर्भरतेचा मूळ इतिहास समजून घेत आधुनिक युगात विकासाला चालना देणे. | • स्पर्धेसाठी आवश्यक साहित्य जसे वह्या, पेन, कागद, गुणदानतक्ता, प्रमाणपत्रे. |

**तयारीसाठी कालावधी : ५ दिवस**
**अंमलबजावणीसाठी कालावधी : १ दिवस**

### कार्यपद्धती

- **पहिली पायरी :** 'आत्मनिर्भर गावाची कल्पना' या विषयाशी संबंधित निबंध स्पर्धेसाठी व्यापक विषय आणि जिंकण्याचे निकष ठरविणे.
- **दुसरी पायरी :** सकाळच्या परिपाठासारख्या मोठ्या उपक्रमांमध्ये स्पर्धेविषयी विद्यार्थ्यांना माहिती देणे.
- **तिसरी पायरी :** स्पर्धेसाठी विषय निवडणे व संबंधित आशयाचे साहित्य शोधणे यासाठी विद्यार्थ्यांना वर्गातही मार्गदर्शन करा.
- **चौथी पायरी :** स्पर्धा आयोजित करण्यासाठी दिनांक, वेळ आणि इतर आवश्यक साहित्य पुरवठा यांची अंतिम निश्चिती करा.
- **पाचवी पायरी :** स्पर्धा घ्या आणि सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक करा. विविध सर्जनशील माध्यमातून व्यक्त होण्यासाठी स्पर्धा विविध वयोगटात घ्या.
- **सहावी पायरी :** पूर्वनिर्धारित निकषांवर स्पर्धेचा विजेता निवडा.
- **सातवी पायरी :** शालेय परिपाठ किंवा पालक–शिक्षक सभा यांसारख्या पुढील मोठ्या सभेत विजेत्यांची घोषणा करणे व त्यांना कौतुकपर बक्षिसे द्या.

| अपेक्षित परिणाम | मूल्यमापन |
| --- | --- |
| • शाश्वत जीवनाला आधार देण्यासाठी प्रादेशिक परंपरा/जीवन पद्धती कशी मदत करते हे विद्यार्थी शिकतील.<br>• अभ्यासपूर्ण माहितीचा शोध घेऊन ते स्पर्धेमध्ये सक्रिय सहभाग घेतील. | • पुढील निकषांच्या आधारे स्पर्धेच्या निबंधांचे मूल्यमापन व्हावे.<br>– मध्यवर्ती कल्पनेशी सुसंगत सुस्पष्टता<br>– विषयाचे सखोल ज्ञान<br>– वैशिष्ट्यपूर्ण दृष्टिकोन<br>– वेगळेपणा<br>– माध्यमांचा नावीन्यपूर्ण वापर |





सप्ताह तेवीस

## प्रण – ३ आपल्या समृद्ध वारशाचा अभिमान

### कृती प्रकल्प : ऐतिहासिक वारसास्थळांना भेटी

| उद्दिष्ट | साहित्य |
|---|---|
| • विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक वारसा समजून घेण्यासाठी वारसा स्थळांना भेटींचे आयोजन करणे व स्थानिक इतिहासाबद्दल अभिमान वाढविणे. | • कर्मचारी सभेसाठी विषयपत्रिका आणि नोट्स वर्गशिक्षकांसाठी योजनेचे अवलोकन करणारी कागदपत्रे<br>• प्राथमिक संशोधनासाठी मार्गदर्शक तत्त्वे<br>• विद्यार्थ्यांना संशोधनास मार्गदर्शन करण्यासाठी संशोधन नमुना, कृतिपत्रिका.<br>• प्रत्याभरण प्रपत्र |


**तयारीसाठी कालावधी : २ ते ३ दिवस**
**अंमलबजावणीसाठी कालावधी : २ दिवस**

### कार्यपद्धती

- **पहिली पायरी :** ऐतिहासिक वारसा भेटीच्या नियोजनविषयक चर्चा करण्यासाठी व दिशा निश्चित करण्यासाठी कर्मचारी सभा बोलवा.
- **दुसरी पायरी :** विद्यार्थ्यांना प्रकल्पाची ओळख करून देणे आणि त्यांचे गट तयार करण्यासाठी वर्गशिक्षकांना मार्गदर्शन करा.
- **तिसरी पायरी :** प्रत्येक विद्यार्थी गटाला दिलेल्या स्थळाचे ऐतिहासिक महत्त्व व वैशिष्ट्ये लक्षात घेऊन प्राथमिक संशोधन करण्यास प्रोत्साहित करा.
- **चौथी पायरी :** स्थानिक स्थळे आणि संग्रहालये येथे भेट देण्यासाठी व आवश्यक प्रवास सुविधा निश्चित करण्यासाठी समन्वय साधा. दूरच्या ठिकाणांसाठी पर्याय म्हणून माहितीपट दाखवा.
- **पाचवी पायरी :** शिक्षकांसोबत सुरक्षा मार्गदर्शक तत्त्वांचे पुनरावलोकन करा.
- **सहावी पायरी :** सांस्कृतिक स्थळे/संग्रहालये/ऐतिहासिक स्थळे येथे मार्गदर्शित भेटी आयोजित करा.
- **सातवी पायरी :** स्थळांचे फोटो आणि माहिती लिहून घेण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करा.
- **आठवी पायरी :** गटासोबत हव्या त्या स्वरूपात अहवाल सादर करण्यास विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करा आणि वर्गासमोर त्यांचे सादरीकरण करण्यास सांगा.

| अपेक्षित परिणाम | मूल्यमापन |
| --- | --- |
| • स्थानिक वारसास्थळे, संग्रहालये आणि ऐतिहासिक ठिकाणे यांची खोलवर समज प्राप्त होऊन विद्यार्थी महत्त्व जाणून घेतील.<br>• प्राथमिक संशोधन पार पाडताना लागणारी कौशल्ये विकसित होतील. | • विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक संकेतस्थळावर तयार केलेले अहवाल गोळा करा आणि विद्यार्थ्यांना त्यांचे अनुभव त्यांच्या गटात सादर करण्यास सांगा.<br>• ऐतिहासिक माहितीची अचूकता, विश्लेषणाची खोली, सर्जनशीलता आणि सादरीकरणाचा आराखडा अशा विविध निकषांवर विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या अहवालांचे परीक्षण करा.<br>• विद्यार्थ्यांकडून त्यांच्या अनुभवांबद्दल प्रतिक्रिया गोळा करा. |



## प्रण – ४ एकता

### कृती प्रकल्प : भाषा शिक्षणासाठी पोषक वातावरण

| उद्दिष्ट | साहित्य |
| --- | --- |
| • भाषिक विविधता आणि एकता यांना प्रोत्साहन देत शालेय परिसरात, जेथे विद्यार्थी एकत्र येतात तेथे भाषा शिक्षणासाठी पोषक वातावरण निर्माण करणे. | • इंटरनेट किंवा समाजातील सदस्यांकडून भाषा शिक्षणाची साधने<br>• भाषा शिक्षणाला पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी नियोजित साहित्य (पुस्तके, कागद, तक्ते इत्यादी.) |


**तयारीसाठी कालावधी : ४ दिवस**
**अंमलबजावणीसाठी कालावधी : २ दिवस**

### कार्यपद्धती

- **पहिली पायरी :** ज्या भाषा शिकायच्या आहेत त्यांची अंतिम निवड करून त्यांचे स्रोत आणि पोषक वातावरणाच्या आराखड्यांचे नियोजन करा.
- **दुसरी पायरी :** वेळापत्रकात सरावाला प्रोत्साहन देण्यासाठी थोडा वेळ समाविष्ट करा.
- **तिसरी पायरी :** विद्यार्थ्यांचे गट तयार करून त्यांना इतर विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी भाषा निवडून द्या.
- **चौथी पायरी :** भाषा शिकविण्याच्या नावीन्यपूर्ण पद्धती शोधून आणि वर्गात विद्यार्थ्यांमध्ये प्रसार करून त्याचा स्वीकार करा.
- **पाचवी पायरी :** भाषा शिक्षणाच्या वर्गावर लक्ष ठेवा.
- **सहावी पायरी :** विद्यार्थी आणि शिक्षक यांचेकडून भाषा शिक्षणासाठीच्या पोषक वातावरणाचा पाठपुरावा घेणे आणि आवश्यक बदल करा.
- **सातवी पायरी :** शाळा स्तरावरच्या विविध प्रसंग आणि कार्यक्रमादरम्यान विविध भाषांचा वापर करावा.

| अपेक्षित परिणाम | मूल्यमापन |
|---|---|
| • विद्यार्थ्यांमध्ये भाषिक वैविध्याची जाणीव वाढीस लागते.<br>• देशातील विविध भाषांमधील रोजची वाक्ये आणि मूलभूत अभिवादनाचे शब्द यांचा विद्यार्थी अभ्यास करतील. | • ठरावीक कालावधीनंतर भाषाशिक्षणासाठीच्या पोषक वातावरणाचे स्वरूप यांची नोंद ठेवणे व त्यावर लक्ष ठेवा.<br>• शाळेच्या विविध कार्यक्रमाप्रसंगी शिकलेल्या भाषांचा वापर करा. |








## प्रण – ५ नागरिकांमध्ये कर्तव्यपालनाचे भान

### कृती प्रकल्प : चला करू पुन:प्रक्रिया

| उद्दिष्ट | साहित्य |
|---|---|
| • शाश्वततेला प्रोत्साहन देत विद्यार्थ्यांना ते दैनंदिन आयुष्यात वापरण्यास प्रोत्साहित करणे. | • शाश्वतता आणि 5 'R' रिड्यूस (कमी करणे), रिसायकल (पुनःप्रक्रिया), रिफ्यूज (नकार), रियूज (पुनर्वापर), आणि रिपरपज (पुनरुद्देश) याविषयी छापील पत्रके.<br>• स्वच्छता मोहिमेचे वेळापत्रक आणि विषयपत्रिका |

**तयारीसाठी कालावधी : ३ दिवस**
**अंमलबजावणीसाठी कालावधी : २ दिवस**

### कार्यपद्धती

- **पहिली पायरी :** स्वच्छता, पुनःप्रक्रिया आणि साहित्याचा पुनर्वापर यांचे महत्त्व स्पष्ट करीत विद्यार्थ्यांना प्रकल्पाची ओळख करून द्या.
- **दुसरी पायरी :** कचऱ्याच्या विलगीकरणाच्या संकल्पनेची ओळख करून द्या.
- **तिसरी पायरी :** विद्यार्थी सोबत घेऊन शाळा आणि परिसरात स्वच्छता मोहीम राबवा.
- **चौथी पायरी :** संग्रहित कचऱ्यातून पुनर्वापर करण्यास योग्य आणि अयोग्य साहित्याचे विलगीकरण कसे करावे याचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करा.
- **पाचवी पायरी :** पुनःप्रक्रिया करण्यायोग्य साहित्यापासून शोभेच्या वस्तू तयार करण्याविषयी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करा.
- **सहावी पायरी :** एकत्र केलेल्या साहित्यातून शोभेच्या आणि वापरण्यायोग्य साहित्याची निर्मिती विद्यार्थ्यांकडून तयार करून घेण्यासाठी सत्र आयोजित करण्यासाठी शिक्षकांना मार्गदर्शन करा.
- **सातवी पायरी :** विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या साहित्याचे प्रदर्शन आयोजित करा.

| अपेक्षित परिणाम | मूल्यमापन |
|---|---|
| • आपली नागरी जबाबदारी आणि पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व विद्यार्थ्यांना स्पष्टपणे समजेल.<br>• पर्यावरणीय गरजा आणि त्यात आपण कसे योगदान देऊ शकतो याविषयी अधिक जाणीव निर्माण होईल. | • स्वच्छता मोहिमेविषयी विद्यार्थ्यांकडून प्रत्याभरण मिळवा.<br>• निरीक्षण पडताळणी सुचीमध्ये मध्यवर्ती कल्पनेची स्पष्टता, 5 'R' मधील फरक यांचा समावेश असावा.<br>• साहित्य निर्मिती कृतीदरम्यान विद्यार्थ्यांचा सहभाग आणि प्रतिबद्धता यांचे निरीक्षण करा.<br>• मूळ संकल्पनेच्या धारणेचे मूल्यमापन करण्यासाठी पाठपुरावा सत्राचे आयोजन करा. |











माझ्या नोंदी :

माझ्या नोंदी :

**माझ्या नोंदी :**

57

अंमलबजावणीविषयक अतिरिक्त माहिती
गुगल फॉर्ममध्ये अद्ययावत करण्यासाठी
वरील क्यूआर कोड स्कॅन करा.

# PM SHRI शाळा

## उदयोन्मुख भारतासाठी

**‘शिक्षण हे सगळ्यात प्रभावी शस्त्र आहे ज्याचा वापर करत तुम्ही जग बदलू शकता.’**

सत्यमेव जयते

शालेय शिक्षण व साक्षरता विभाग
Department of School Education and literacy

Pradhan Mantri ScHools for Rising India
PM SHRI
Creating holistic and well-rounded individuals equipped with key 21st Century skills

मुद्रक : रत्ना ग्राफिक्स, पुणे.